संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २३.०५.२०२५ | अंक नं. ४५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

आमरसासह राजस्थानी थाळी
स्वादिष्ट.. रुचकर भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर. फोन : 2327060, 9850799850

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
Help line 9112288611 / 8888982222

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चांदीच्या अप्रतिम असंख्य डिझाईन्स व चांदीचा दर शुध्दतेनुसार
चांदीच्या 92.5 शुध्दतेमधील सर्व प्रकारच्या मुर्ती, मिकी माऊस, ग्लास, प्लेट, वाटी, चमचा, सोबतच मंगळसूत्र, चैन, अंगठी, कडे, टॉप्स, पायल, स्टर्लिंग ज्वेलरीची भव्य श्रेणी.
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%
कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%
आपला जुना दागिना एक्स्चेंज करा आणि मिळवा 100%

# नगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी ४८५ कोटी रुपयांचा निधी मंजूर

## जागा निश्चितीसाठी मंत्र्यांची समिती गठित

नगर – नगर जिल्ह्यातील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी ४८५.०८ कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाने मंजूर केला आहे. मात्र या महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध झालेली नसून, त्या जागेच्या निश्चितीसाठी मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने मंत्र्यांची समिती गठित करण्यात आली आहे. १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व त्यासंलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने उभारण्यात येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय २३ मे रोजी जारी करण्यात आला आहे.

राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार राज्यातील पालघर, गडचिरोली, अमरावती, वाशिम, जालना, बुलढाणा, ठाणे, भंडारा, वर्धा व हिंगोली या १० जिल्ह्यांमध्ये यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यात आली होती. परंतु नगर जिल्ह्यात सुयोग्य जागेअभावी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मान्यता देण्यात आली नव्हती. त्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील जनतेस अधिकाधिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे महाविद्यालय व संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास चौंडी येथे ६ मे रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीस मंजुरी देण्यात आली होती. या मंजुरीनंतर याबाबतचा शासनादेश २३ मे रोजी जारी करण्यात आला आहे. त्यात महाविद्यालय उभारणीसाठी ४८५.०८ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. महाविद्यालयासाठी सुयोग्य जागेची निवड करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने मंत्र्यांची समिती गठित करण्यात आली आहे. सदर जागा महसूल विभागाच्या सहमतीने संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत वैद्यकीय शिक्षण विभागाकडे निःशुल्क हस्तांतरित करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार या महाविद्यालयासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा सामान्य रुग्णालय, आवश्यक स्थावर जंगम मालमत्ता व मनुष्यबळासह तात्पुरत्या स्वरूपात किमान ७ वर्षासाठी वैद्यकीय शिक्षण विभागास निःशुल्क वापरण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच या महाविद्यालयाच्या उभारणीसाठी प्रशासकीय इमारत, चिकित्सालयीन विभाग, रुग्णालयीन इमारत, अधिकारी–कर्मचारी आवास आणि विद्यार्थी वसतिगृह यांच्या बांधकामास तसेच यासाठी लागणारे अधिकारी–कर्मचारी यांची पदे भरण्यासही या शासनादेशाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

पुनर्विवाह वधू पाहिजेत
अपंग, लंगडी, मुकी, बहिरी, व्यंग, निराधार, पिडीत महिला आधार, जीवनाला कंटाळलेले, आधार नसलेले विधवा २२ ते ६० वय असलेले भेटा..
9892911602

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
दर रविवारी दालबाटी व चुरमा
व दररोज आमरसाचा बेत
हापुस आमरस 400/- किलो
ट्रेन पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टी सुविधा उपलब्ध.
कापड बाजार, अहिल्यानगर. पार्सल सुविधा उपलब्ध...

SONi Since 1965 TILES AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज

SHRI SANDIPANI ACADEMY™
ISO 9001 : 2015
#NO.1 INSTITUTE FOR IIT-JEE | NEET | MH CET
7501-988-988 www.shrisandipaniacademy.in IIT-JEE Campus, Ekvira Chowk, Ahilyanagar 414 003
श्री श्री राधा-कृष्णांच्या अहिल्यानगर मधील आगमनाच्या आनंद व्यक्तीकरणार्थ, सांदिपनी अकॅडमी प्रस्तुत,
शिकण्याची इच्छा, उंच भरारीची दिशा..
उड़ान
CBSE व स्टेट बोर्डाच्या 6 वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण
पात्रता: • कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ₹3 लाखांपेक्षा कमी असावे
• मागील वर्गात किमान 70% गुण आवश्यक.
पोलीस शिपाई | सैन्य व संरक्षण कर्मचारी | शेतकरी | एकट्या मातांचा संघर्ष | शिक्षक | नर्सेस | कंपनीत काम करणारे कर्मचारी | रिक्षा चालक | अनाथ आश्रमातील मुले | लघु व्यवसायिकांची मुले | इतर पात्र विद्यार्थी
प्रत्येक गटासाठी जागा: 20 जागा | एकूण जागा: 220 जागा | निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी: 100% शिक्षण शुल्क माफ
अभ्यास विषय: गणित, इंग्रजी, सामाजिक शास्त्र, विज्ञान. *सर्व हक्क राखीव. उच्च प्राधिकरणांच्या आवश्यकतेनुसार बदल केले जाऊ शकतात.
A VISION OF DR. BALRAJU KARRI Managing Director, Shri Sandipani Academy
EDUCATE INDIA PROJECT
EMPOWER "EDUCATION BEYOND BARRIERS"
स्कॉलरशिप परिक्षा
• 10 वी मधुन 11 वी मध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी •
EXAM: SUNDAY | MAY 25, 2025 • 11 AM TO 1 PM
80 JEE | NEET | MH-CET मोफत शिक्षण
IIT-JEE: 40 विद्यार्थी
NEET: 20 विद्यार्थी
MH-CET: 20 विद्यार्थी
एम्पॉवर स्कॉलरशिप स्कीम, मार्किंग स्कीम आणि परीक्षा पॅटर्न व मोफत नावनोंदणी साठी स्कॅन करा.
* टीप : स्कॉलरशिप साठी पात्र होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची संपूर्ण कागदपत्रे आणि आर्थिक परिस्थितीचे टीम तर्फे प्रत्येक अवलोकन आणि खातरजमा केली जाईल आणि वरील माहिती चुकीची आढळल्यास किंवा स्कॉलरशिप साठी पात्रता पूर्तता होत नाही असे आढळल्यास आपणास स्कॉलरशिपच्या फायद्यांपासून अपात्र केले जाईल.

# नगरजवळील ‘रेड क्रॉस सोसायटी’च्या जागेतच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात यावे

### जागरूक नागरिक मंच, जनहित परिषद व परिसरातील नागरिकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अरणगाव जवळील रेड क्रॉस सोसायटीच्या जागेतच उभारण्यात यावे या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांना देताना जागरूक नागरिक मंचचे सुहास मुळे यांच्यासह जनहित परिषदेचे सदस्य व परिसरातील नागरिक. (छाया – लहू दळवी)

नगर – महाराष्ट्र शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यात मंजूर केलेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नगर शहरालगत अवघ्या ५ किलोमीटर अंतरावर अरणगाव येथे वर्षानुवर्ष पडीक असलेल्या आणि सहज उपलब्ध असलेल्या रेड क्रॉस सोसायटीच्या टीबी सेनेटोरियमच्या सुमारे २५ एकर जागेतच उभारण्यात यावे, अशी मागणी जागरूक नागरिक मंच व जनहित परिषद तसेच अरणगाव परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, आरोग्य विषयी धोरणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने काही निवडक जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सदर महाविद्यालय हे इतर कुठल्याही बाबतीत आघाडीवर नसलेल्या या अहिल्यानगर शहराच्या भेडसावणाऱ्या बेरोजगारीवर आणि एकंदर सुख सुविधा, व्यवसाय आणि साधनसंपत्तीवर फार मोठा सकारात्मक परिणाम होण्यासाठी हे नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय नगर शहरातच झालं पाहिजे, असं एकूण एक नागरिकाचे मत आहे.

यासाठी शहराच्या चारही दिशेला शासकीय जमिनीदेखील उपलब्ध आहेत. त्यापैकी सर्वात सोयीस्कर, कमी खर्चाची आणि एक मोठा वैद्यकीय इतिहास असलेली उपलब्ध जागा म्हणजे अरणगाव मेहराबाद येथील बायपास रोडटच टीबी सेनेटोरियमची जागा. मागील ३०–४० वर्षांपासून ही जागा अनेक वर्षे उपयोगातच न आणल्यामुळे सध्या दुर्लक्षित पडीक पडलेली आहे. जर शासनाने संबंधित रेड क्रॉस सोसायटीकडून ती पुन्हा हस्तगत केली, आणि त्या ठिकाणी ब्रिटिशकालीन बांधलेल्या पंधरा–वीस मोठ मोठ्या बराकी सारख्या इमारतींचा योग्य प्रकारे डागडुजी करून आणि मध्यभागी एक मध्यवर्ती मोठी इमारत उभारून हा प्रकल्प अमलात आणला तर एकेकाळी महाराष्ट्रातील अग्रगण्य मोठे वैद्यकिय इन्फ्रास्ट्रकचर असलेल्या या टीबी सेनेटोरियमचा उद्धार होईल व पुन्हा एकदा वैभवाचे दिवस येतील.

## अन्यथा शासनाला मोठ्या जनक्षोभाला सामोरे जावे लागेल

या सर्व पातळीवर जागरूक नागरिक मंच व जनहित परिषद यांचे अध्यक्ष सुहास मुळे आणि महाराष्ट्र हाऊसिंग स्टेट फायनान्स कार्पोरेशनचे माजी चेअरमन किसनराव लोटके यांनी सदर प्रकल्पाबाबत फिजिबिलिटी अहवाल तयार केला. रेड क्रॉस सोसायटीचे काही सदस्य व पदाधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष बोलून त्यांचा देखील या प्रकल्पासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळवला आहे. अरणगाव येथील गट क्रमांक ५९ ची रेड क्रॉस सोसायटीच्या नावे असलेली ९.८९ हेक्टर जागा उपलब्ध आहे, त्यापैकी ५५ आर जागा बायपासला संपादित करण्यात गेली आहे. ही सर्व सुविधा युक्त जागाच या प्रकल्पासाठी घेण्यात यावी. अन्यथा फार मोठ्या जनक्षोभाला शासनाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही जनहित परिषदेतर्फे देण्यात आला आहे.

खडकी, खंडाळा, सोनेवाडी, अरणगाव, बाबुर्डी वगैरे आसपासच्या सर्व परिसरातून सर्व नागरिक यांच्यावतीने माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, अरणगावचे सरपंच पोपटराव पुंड, भाजपा तालुकाध्यक्ष दीपक कार्ले, सोनेवाडीचे सरपंच विठ्ठलराव दळवी, खडकीचे सरपंच प्रमोद कोठुळे, राहुल बहिरट, अरणगाव ग्रामपंचायत सदस्य दिलीप कांबळे, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख आनंदराव शेळके यांनी सदर प्रकल्पाची मागणी करून पाठिंबा व दर्शवला आहे. अरणगावचे माजी सरपंच सुधीर कांबळे, मोहन गहिले, विठ्ठलराव दळवी, संतोष शिंदे, बबनराव शिंदे, अरणगाव येथील सोसायटीचे चेअरमन ज्ञानदेवराव शेळके, शिवाजी मोरे, तालुका भाजपा सरचिटणीस प्रशांत गहिले, बाळासाहेब शिंदे, सोसायटीचे माजी चेअरमन महेश पवार, अवतार मेहेरबाबा चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व सदस्य व मेहेरनाथ कलचुरी, रमेश जंगले तसेच संत बुवाजी बुवा सेवा ट्रस्टचे सर्व पदाधिकारी या प्रकल्पासाठी प्रयत्नपूर्वक कार्यरत आहेत. त्यामुळे याचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगर महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदावर पुर्ववत रुजू करुन घ्यावे : डॉक्टर अनिल बोरगे यांचे आयुक्तांना पत्र

## निलंबन कालावधीतील सर्व वेतन, भत्ते तात्काळ द्यावेत



नगर – महापालिकेच्या चौकशी समितीने अर्धवट कागदपत्रांच्या आधारे अहवाल तयार करुन आर्थिक अपहाराच्या गुन्ह्यात माझे नाव गोवण्यात आले. मात्र या गुन्ह्याच्या तपासात माझ्या विरुद्ध आरोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावा उपलब्ध नसल्याने पोलिसांनी या गुन्ह्यातून आपले नाव वगळले असल्याने माझे निलंबन आपोआप संपुष्टात आलेले आहे. त्यामुळे मला माझा धारणाधिकार प्राप्त असणाऱ्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर संपुर्ण सन्मानाने तात्काळ रुजु करुन घेण्यात यावे. तसेच निलंबन कालावधीतील सर्व वेतन, भत्ते तात्काळ अदा करण्यात यावे. अशी मागणी डॉ.अनिल बोरगे यांनी महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

या पत्रात डॉ.बोरगे यांनी म्हंटले आहे की, माझी नेमणुक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ नुसार करण्यात आलेली आहे. त्यामुळे कलम ५८ अन्वये १ महिन्यापेक्षा अधिक काळ सक्तिच्या रजेवर ठेवणे करीता शासनाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक होते, त्या शिवाय मला सक्तिच्या रजेवर पाठविण्यात आले. याबाबत आदेश हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे उल्लंघन करुन काढलेला आहे. कारण आरोग्य विभागाच्या रॅकींगमध्ये २६ क्रमांकाहुन १६ व्या क्रमांकापर्यंत जानेवारी २०२५ अखेर प्रगती झालेली आहे. तसेच माझ्या अपरोक्ष व मला कुठलीही संधी न देता नेमलेल्या चौकशी समितीने अर्धवट कागदपत्रांच्या आधारे अहवाल तयार करुन व तसे अहवालात नमुद करुन बोगस व तपासणीबाबतचे नियम डावलून तयार केलेला आहे. या अपूर्ण व अर्धवट कागदपत्रांच्या अहवालाचा आधार घेऊन मला कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

याशिवाय बोगस अहवालाच्या आधारे माझेवर महानगरपालिकेतर्फे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे माझे निलंबन करण्यात आलेले आहे. उपरोक्त बोगस व अर्धवट कागदपत्रांच्या व त्रिसदस्यांचे अहवाल व साक्षी घेऊन व प्रकरणाची संपूर्ण शहानिशा करुन कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गुन्हा क्र. १८८/२०२५ मधुन मी निर्दोष असल्याने माझे नाव वगळण्यात आलेले आहे. त्यामुळे शासन निर्णयानुसार माझे निलंबन आपोआप संपुष्टात आलेले आहे.

त्यामुळे मला माझा धारणाधिकार प्राप्त असणाऱ्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर संपुर्ण सन्मानाने तात्काळ रुजु करुन घेण्यात यावे. निलंबन कालावधीतील सर्व वेतन, भत्ते तात्काळ अदा करण्यात यावे. त्रिसदस्यीय समितीने दिलेला अहवाल हा अर्धवट असलेबाबत त्रिसदस्यीय समितीने अस्विकृती प्रमाणपत्राच्या सुरुवातीला नमुद केल्याप्रमाणे अपूर्ण कागदपत्रे व तपासणीच्या शासनाच्या एस.ओ.पी.चे पालन झालेले नसल्याने सदर अहवाल तयार करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व सदरचा अहवाल तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी डॉ. अनिल बोरगे यांनी मनपा आयुक्त यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...



### अज्ञात विवेकानंद...

'वाचनप्रसंग' या पुस्तकात नितीन वैद्य लिहितात–

गेले दोन दिवस विवेकानंदांच्या सहवासात – 'अज्ञात विवेकानंद' हे मणिशंकर मुखोपाध्याय (अनुवाद – मृणालिनी गडकरी) यांचं पुस्तक वाचत होतो.

मला ज्ञात विवेकानंदही तपशिलानं फारसे माहीत नव्हते; पण या पुस्तकातलं विवेकानंदांच्या विराट प्रतिमेमागचे मानवी रूपही तितकेच लोभस आहे.

आयुष्यभराचा शारीरिक दाह, लौकिकार्थाने संन्यास स्वीकारल्यावरही न चुकलेल्या, न नाकारलेल्याही कौटुंबिक जबाबदाऱ्या, त्यासाठीची सततची आर्थिक विवंचना, आप्तांशीच जवळपास शेवटपर्यंत चाललेले न्यायालयीन संघर्ष... या साऱ्याच्या वरताण दिग्विजय गाजवत असतानाही जपलेले खाण्याचे त्यापेक्षाही खाऊ घालण्यातले निखळ, निरागस आनंद...

मणिशंकर (मूळ लेखक) म्हणतात की, संन्यास म्हणजे मृत्युवर प्रेम करणे. मात्र याचा अर्थ आत्महत्या नव्हे. मरण अटळ आहे हे समजून घेत हळूहळू स्वतःला दुसऱ्यांच्या भल्यासाठी समर्पित करणे...

नरेंद्र दत्त असे जगले आणि स्वामी विवेकानंद होऊन चाळीशीही येण्याआधी विराटात विलीन झाले.

आजवर विवेकानंद थोडेफार वाचले ते अन्य कुण्या–कुठल्या संदर्भाने. आता ज्ञात विवेकानंदही तपशीलाने, स्वतंत्रपणे वाचायला हवेत.

खरंतर बंगाली साहित्य, कवी, स्वातंत्र्ययोद्धे, समाजसुधारक यांची मोठी मांदियाळी आहे. आपल्या मराठी साहित्य, कला, सांस्कृतिक परंपरेप्रमाणे त्यांचीही परंपरा समृद्ध आहे. रविंद्रनाथ टागोर, सुभाषचंद्र बोस, विमल रॉय, तेथील फुटबॉल प्रेम, अनेक नावे आदर्श आहेत. वाचनीय आहेत.

## मनपा आयुक्त डांगे १५ दिवसांच्या रजेवर

### जिल्हाधिकाऱ्यांकडे आयुक्त पदाचा पदभार

नगर – महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे हे रजेवर गेल्याने आयुक्त व प्रशासक पदाचा कार्यभार जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. आयुक्त डांगे हे २१ मे पासून १५ दिवस अर्जित रजेवर गेले आहेत. त्यामुळे नगरविकास विभागाने त्यांच्या पदाचा कार्यभार जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार २२ मे पासून आयुक्त व प्रशासक या पदाचा कार्यभार जिल्हाधिकारी आशिया यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

# अप्पू हत्ती चौक लालटाकी ते सबलोक पेट्रोलपंप या रस्त्याला 'क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मार्ग' असे नामकरण करावे

नगर – अप्पू हत्ती चौक लालटाकी ते सबलोक पेट्रोलपंप रस्त्यास 'क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मार्ग' नाव देण्याचा ठराव येत्या सभेत घेवून मंजूर करावा. या रस्त्यास पुर्वी कोणतेही नाव दिलेले नाही, तसा ठराव नाही. तसेच या रस्त्यास नामफलक लावून वरील नाव देण्याचा जाहीर कार्यक्रम करावा, अशी मागणी सत्यशोधक बहुजन आघाडीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे हे महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक, क्रांतिकारक आणि शूर मल्लविद्या प्रशिक्षक होते. ते विशेषतः दलित समाजातून आलेले पहिले क्रांतिकारक म्हणून ओळखले जातात. दलित समाजातील असमानता, अस्पृश्यता आणि शिक्षणापासून वंचित ठेवणे याविरोधात लहुजी वस्ताद साळवे यांनी सर्वांना शिक्षण, समान संधी यासाठी आवाज उठवला, जो नंतर अनेक चळवळींचा पाया ठरला. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी मोलाचे पाठबळ दिले. स्त्रीशिक्षण, शूद्र–अतिशूद्रांच्या हक्कांसाठी ते नेहमी फुल्यांच्या पाठीशी उभे राहिले. स्वातंत्र्य संग्रामात राहून ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या चळवळींना त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यांनी शस्त्रास्त्रांची आणि युद्धकलेची प्रशिक्षण देऊन अनेक क्रांतिकारक घडवले. त्यांचे आखाडे हे केवळ कुस्तीचे प्रशिक्षण देणारे नव्हते, तर ते सामाजिक विचारांचे केंद्र होते.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे दरवर्षी त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विविध कार्यक्रम होतात. अनेक समाजसुधारक त्यांना 'पहिले दलित क्रांतिकारक' व 'समतेचे प्रणेते' मानतात. आपल्या मुलांसाठी, विद्यार्थ्यांसाठी आणि समाजासाठी लहुजी वस्ताद साळवे यांचे जीवन आदर्श आहे. त्यांनी ज्या प्रकारे शिक्षण, समानता आणि स्वाभिमानासाठी झगडले, ते आजही प्रेरणादायी आहे. म्हणून त्यांचे नाव देणे आपले कर्तव्य आहे. तरी ठराव मंजूर करावा. यावेळी संघटनेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष संदिप सकट, शहराध्यक्ष सुनिल ढोले, उपाध्यक्ष श्याम वैराळ, कार्याध्यक्ष जालिंदर शेलार, सचिव योगेश साबळे, सहसचिव सुरेश सकट, खजिनदार महेश सकट, संघटक राहुल ठोकळ, सांस्कृतीक विभाग अध्यक्ष अजय काते, प्रसिध्दी प्रमुख रुपेश जगधणे, किशोर पवार आणि सादिक शेख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अनिता बोल्ली यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – भिस्तबाग चौक, पवननगर येथील रहिवासी अनिता बाबु बोल्ली (वय ५५) यांचे २३ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर नालेगाव अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# लाच मागितल्याप्रकरणी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल

नगर – चोरीच्या गुन्ह्यातील सोने विकत घेतल्याप्रकरणी आरोपी न करण्यासाठी तक्रारदाराकडे ७० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेतील तत्कालिन सहाय्यक फौजदार भाऊसाहेब गोविंद काळे (सध्या नेमणुक एमआयडीसी पोलिस ठाणे) यांच्यावर भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की, तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीत मागील वर्षी घरफोडी झाली होती. या गुन्ह्यातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले होते. आरोपींकडे चौकशी केल्यावर त्यांनी चोरलेले सोने एकाला विकल्याची माहिती दिली होती. तो व्यक्ती यातील तक्रारदार याचा भाऊ होता. त्याला या गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी सहाय्यक फौजदार भाऊसाहेब काळे याने तक्रारदाराकडे ७० हजारांची लाच मागितली याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली या तक्रारीची पडताळणी ९ मे २०२४ रोजी करण्यात आली असता काळे याने तक्रारदाराकडे पंचासमक्ष ७० हजार रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविली होती. त्यामुळे याबाबत भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात सहाय्यक फौजदार काळे याच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलिस उपाधिक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक छाया देवरे, अंमलदार सचिन सुद्रुक, गजानन गायकवाड, रवि निमसे, बाबासाहेब कराड यांच्या पथकाने केली आहे.

## सुशीलाबाई उदारे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – भिंगार येथील सौरभनगर मधील रहिवासी सुशीलाबाई रामकृष्ण उदारे (वय ७९) यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले. भिंगार येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे मुलगा, सुन, मुली, जावई, पुतणे, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. नगर येथील रेव्हेन्यू सोसायटीतील कर्मचारी राजेंद्र उदारे यांच्या त्या चुलती होत.

## संगीता पेगड्याल यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – येथील दिल्लीगेट परिसरातील रहिवासी संगीता रविंद्र पेगड्याल (वय ५५) यांचे २२ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रविद्र पेगड्याल यांच्या त्या पत्नी होत.

## प्रमिला बिंगी यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – येथील लक्ष्मी पतसंस्थेच्या दैनिक प्रतिनिधी प्रमिला अंबादास बिंगी (वय ५५) यांचे २२ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगी, जावई, नातू असा परिवार आहे. त्या मार्कंडेय पतसंस्थेच्या संचालिका होत्या.

## सरस्वती साठे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – कामरगाव येथील रहिवासी सरस्वती किसन साठे



(वय ७७) यांचे अल्पशा आजाराने २२ मे रोजी निधन झाले.

त्यांच्या मागे पती, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सह. महसुल अधिकारी नंदकुमार साठे, संजय साठे व बेबी नाणेकर यांच्या त्या मातोश्री, तर मुख्याध्यापक श्यामसुंदर नाणेकर यांच्या त्या सासू होत.

## इंदुबाई विधाते यांचे हृदयविकाराने निधन

नगर – सारसनगर येथील रहिवासी इंदुबाई मोहनराव



विधाते (वय ८०) यांचे २२ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर जेऊर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. त्या राजेंद्र पडोळे यांच्या सासू तर नंदकुमार विधाते, सुरेश विधाते यांच्या मातोश्री होत.

## नंदकिशोर उपाध्याय यांचे वृद्धापकाळाने निधन

सोलापूर – येथील नंदकिशोर कन्हैयालाल उपाध्याय (वय



८७) यांचे २१ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर सोलापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते अहिल्यानगर येथील सारडा गल्लीतील घर संसार शॉपीचे संचालक अशोक उपाध्याय यांचे ते वडील होत.

त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## गणेश काळे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – येथील सिंधी मंदिर शेजारील वैष्णवी ढोकळा सेंटरचे मालक गणेश निळकंठ काळे (वय ४२) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, चुलते, एक भाऊ, दोन बहिणी, एक मुलगी, चुलत बंधू असा परिवार आहे. माळी बोर्डिंगचे व्यवस्थापक आनंद काळे यांचे धाकटे बंधू, लक्ष्मीकांत रंगनाथ काळे यांचे पुतणे, सावता मंदिर शेजारील काळे टेलर्सचे मालक मनिष काळे, एचडीएफसीचे वसुली अधिकारी सचिन काळे व नितीन काळे यांचे चुलत बंधू होत.

## प्रदिप जाधवराव यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील श्रीरामपूर न.प.चे आरोग्य विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी, शिवभक्त व कारसेवक प्रदिप हंबीरराव जाधवराव (वय ६८) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. श्रीरामपूर न.प.चे वसुली विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी सतीश जाधवराव व सुनील जाधवराव यांचे थोरले बंधू, चि.राजवर्धन जाधवराव यांचे वडील होत.

## अथर्व (कृष्णा) कर्डिले यांचे अपघाती निधन

श्रीरामपूर – पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा विद्यार्थी



अथर्व (कृष्णा) प्रमोद कर्डिले (वय २१) यांचे पुणे येथे ८ मे रोजी मोटरसायकलचा अपघात झाला होता. उपचार चालू असताना २२ मे रोजी सकाळी ९ वा. दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे येथे प्राणज्योत मालवली.

त्यांच्या पश्चात आजी, आई, वडील, बहीण, चुलते, चुलत बंधू, असा परिवार आहे. स्व.नारायणराव भाऊसाहेब कर्डिले यांचे ते नातू होत. इंजिनिअर व आर्किटेक्ट प्रमोद कर्डिले यांचे चिरंजीव, इंजि.कैलास कर्डिले यांचे पुतणे, चि.साई कैलास कर्डिले यांचे चुलत बंधू होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## मोटारसायकलच्या हट्टापायी स्वत:च्या छातीत चाकू मारुन तरुणाची आत्महत्या

नगर – वडिलांकडे मोटारसायकल घेण्याच्या हट्ट धरला,



ऋषभ भंडारी

पण आर्थिक परिस्थिती नसल्याचे वडिलांनी सांगितल्यावर राग अनावर झालेल्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरुणाने स्वतःच्या छातीत चाकू मारुन जीवन संपविल्याची घटना सावेडी उपनगरातील भिस्तबाग चौक येथील गोकुळनगर येथे २२ मे रोजी रात्री घडली. ऋषभ दीपक भंडारी (वय २०, रा.गोकुळनगर, भिस्तबाग चौक, सावेडी) असे मयत तरुणाचे नाव आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की ऋषभ दीपक भंडारी हा इंजीनियरिंग कॉलेज येथे द्रितीय वर्षाला शिक्षण घेत होता. कॉलेजमधील सर्व मित्रांकडे मोटारसायकल असल्याने ऋषभ याने त्याचे वडील दीपक धनराज भंडारी यांच्याकडे काही दिवसांपासून मोटारसायकल घेण्याकरिता हट्ट धरला होता. परंतु भंडारी यांची मोटारसायकल घेण्याची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांनी मोटारसायकल घेतली नाही. त्यामुळे नाराज होऊन ऋषभ याने २२ मे रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास राहत्या घरामध्ये स्वतःच्या छातीत डाव्या बाजूला चाकू मारुन घेतला. त्यामुळे ऋषभ हा जखमी झाला. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यास औषध उपचाराकरिता त्याचे वडील दीपक भंडारी यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी ऋषभ यास तपासून तो औषध उपचार करण्यापूर्वीच मयत झाला असल्याचे सांगितले. या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खेडकर यांनी दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास महिला पोलीस हवालदार संजीवनी नेटके या करीत आहेत.

## रामकृष्ण कोकाटे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी रामकृष्ण सखाराम कोकाटे (वय ७०) यांचे २३ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. बाबासाहेब, दत्तात्रय, राधु कोकाटे यांचे ते वडील होत.

## लक्ष्मण खंडागळे यांचे अपघाती निधन

नगर – केडगाव वेशीजवळील रहिवासी लक्ष्मण तुकाराम



खंडागळे (वय ७२) यांचे केडगाव येथील पंचम हॉटेल जवळ धडक बसल्याने १६ मे रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. सुनील खंडागळे यांचे ते वडील होत.

## गॅस एजन्सी मधून ४ लाख ३१ हजारांचा ऐवज घेवून ५ परप्रांतीय कामगार पसार

नगर – गॅस एजन्सी मध्ये काम करणाऱ्या पाच परप्रांतीय कर्मचाऱ्यांनी गॅस एजन्सीच्या गॅस रिफिलिंगचे पैसे, टाक्या व रेग्युलेटर असा ४ लाख ३१ हजार ७९४ रुपयाच्या ऐवजाची चोरी केली. ही घटना २० मे रोजी सकाळी आठ ते २१ मे सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान बुऱ्हाणनगर येथील कापूरवाडी रोडवरील भारत गॅस कंपनीचे कोहिनूर भारत गॅस गोडावून येथे घडली.

याबाबत कोहिनूर भारत गॅस ऑफिसचे मॅनेजर राहुल बबन भगत (वय ३८, रा. शेंडी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की त्यांच्या एजन्सीमध्ये देवेंद्र कुमार (रा. फतेबाद उत्तर प्रदेश), सोनू बघेल, आशिष, नजरुद्दीन, प्रयाग (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) या ५ जणांनी २० मे रोजी सकाळी आठ ते २१ मे रोजी सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान एजन्सीच्या भारत गॅस कंपनीच्या १२४ टाक्याचे रिफिलिंगचे १ लाख ७ हजार ३८४ रुपये, भारत गॅस कंपनीच्या १ लाख ८४ हजार ५०० रुपये किमतीच्या ५५ टाक्या व कोहिनूर गॅस एजन्सी २७ टाक्या, भारत गॅस कंपनीच्या ३९ टाक्या व त्यांची रेग्युलेटर असा १ लाख ३८ हजार ४५० रुपयाचे साहित्य व ५ किलो ग्रॅम वजनाची एक टाकी असा ४ लाख ३१ हजार ७९४ रुपयाचा ऐवज चोरुन नेला. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात राहुल भगत यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पाच जणांविरुद्ध बी एन एस कलम ३०६, ३ (५) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला.

## स्वस्तात घर घेऊन देतो असे सांगून साडेसहा लाख रुपयांची फसवणूक

नगर – २२ लाख रुपयांमध्ये घर घेऊन देतो असे सांगून विश्वास संपादन करुन वेळोवेळी ६ लाख ५० हजार रुपये घेऊन घर न देता तसेच दिलेले पैसे ही परत माघारी न देता फसवणूक केल्याची घटना २९ डिसेंबर २०२३ ते १३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान सावेडी परिसरातील बालिकाश्रम रोडवरील सुडके मळा येथे घडली.

याबाबत राजेश्वर मनोहर भोसले (वय ४४, रा. सुडके मळा, बालिकाश्रम रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी यांचे भाचे जावई संकेत राजेंद्र भोसले (रा. पिंपळगाव माळवी, ता. नगर) यांनी फिर्यादी यांना २२ लाख रुपयांमध्ये घर घेऊन देतो असे सांगून विश्वास संपादन केला. फिर्यादी यांनी घर घेण्यासाठी २९ डिसेंबर २०२३ पासून ते १३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान वेळोवेळी ४ लाख ४७ हजार रुपये ऑनलाईन व २ लाख ३ हजार रुपये रोख स्वरूपात असे ६ लाख ५० हजार रुपये दिले. पैसे देऊनही संकेत भोसले याने घर दाखवले नाही, त्यामुळे फिर्यादी यांनी दिलेले पैशाची मागणी केली असता त्याने पैसे देण्यास वेळ काढूपणा केला.

त्यानंतर संकेत भोसले याने फिर्यादीस २८ मे २०२४ रोजी सहा लाख ५० हजार रुपयाचा एचडीएफसी बँकेचा चेक व २० हजार रुपये रोख दिले. त्यानंतर पुन्हा ६ लाख ३० हजार रुपयांचा जिल्हा सहकारी बँकेचा चेक दिला परंतु दोन्ही चेक वटले नाही. त्यामुळे फिर्यादी यांना पैसे मिळाले नाही. यावरून फिर्यादी यांच्या लक्षात आले की संकेत भोसले याने फिर्यादी यांना कोरे चेक देऊन पैसे देण्यास टाळाटाळ केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी फसवणूक झाल्याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार अर्ज केला होता. त्यावर चौकशी होवून गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले.

त्यानुसार तोफखाना पोलिसांनी राजेश्वर भोसले यांच्या फिर्यादीवरुन संकेत भोसले यांच्या विरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४२०, ४०६ प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास सहाय्यक फौजदार गोरडे हे करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### गुडघेदुखीवर घरगुती उपाय

गुडघेदुखीवर हा घरगुती उपाय करण्यासाठी आपल्याला फक्त १ कांदा, वाटीभर मोहरी, ३ टेबलस्पून मोहरीचे तेल आणि एक कॉटनचा रुमाल इतक्या गोष्टींची गरज लागणार आहे. गुडघेदुखीवरील हा सोपा घरगुती उपाय आहे. सर्वात आधी एक कॉटनचा कपडा अंथरुन या कपड्याचा बरोबर मधोमध वाटीभर मोहरी ओतून घ्यावी. त्यानंतर या मोहरी दाण्यांच्या बरोबर मधोमध एक कांदा सालीसकट ठेवावा. आता रुमालाची चारही टोक मध्यभागी एकत्रित घेऊन एक मसाज पोटली तयार करून घ्यावी. आता गुडघ्यावर हलकेच गरम केलेले मोहरीचे तेल लावून हलक्या हाताने चोळून मसाज करून घ्यावा. त्यानंतर गॅसच्या मध्यम आचेवर पॅन ठेवून त्यावर ही तयार पोटली ठेवून स्वतःला सोसवेल इतकी गरम करून घ्यावी. त्यानंतर या गरम पोटलीने गुडघा शेकून घ्यावा.

## पाककला

### तुर आणि वालाची खिचडी

**साहित्य :** १ वाटी तूर आणि वालाचे दाणे, १ बटाटा, १ टोमॅटो, २ कांदे, १ चमचा आले लसूण भरडा, १ चमचा बारीक कापलेली कोथिंबीर, २ पळी तेल, १/२ चमचा जीरे, १ तमालपत्र, ३ लवंगा, ३ काळी मिरी, दालचिनीचा छोटासा तुकडा, मीठ चवीनुसार, १ वाटी वाडा कोलम तांदूळ, १/२ चमचा हळद, १ चमचा संडे मसाला,

**कृती :** प्रथम वालाचे दाणे आणि तुरीचे दाणे स्वच्छ धुऊन घ्यावेत बटाट्याच्या मोठ्या फोडी कापून घ्याव्यात. कांदा, कोथिंबीर आणि टोमॅटो बारीक चिरून घ्यावा. नंतर छोट्या कुकरमध्ये तेल टाकून फोडणीसाठी जीरे त्याचप्रमाणे लवंग काळीमिरी तमालपत्र आणि दालचिनीचा तुकडा टाकावा. त्यानंतर कांदा परतून घ्यावा, त्यात आले लसणाचे वाटण छान परतून घ्यावे, नंतर टोमॅटो परतून घ्यावा, हळद, मिरची पावडर घालावी, तीही परतून घ्यावी नंतर तांदूळ घालून दोन तीन मिनिटे सर्व साहित्य नीट परतून घ्यावे. एका बाजूला पाणी गरम करत ठेवावे. पाण्याला एक उकळी आल्यावर ते खिचडीच्या साहित्यावर टाकून गरजेप्रमाणे मीठ घालून एक उकळ येऊ द्यावी व नंतर कुकर बंद करून मंद गॅसवर दहा मिनिटे ठेवावे. कुकर उघडल्यानंतर बारीक कोथिंबीर घालून गरमागरम खिचडी लिंबूच्या आंबट गोड लोणच्या बरोबर सर्व्ह करावी.

## वास्तू

### घड्याळासंबंधी दिशा

घरातील घडाळ्यांना महत्त्वाचे स्थान असते. घराची सजावट करताना घड्याळाच्या स्थानाकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असते. घड्याळ कधीही दक्षिण दिशेला लावू नये, असे सांगितले जाते. कारण दक्षिण दिशेला घड्याळ लावल्यास आपले लक्ष कायम दक्षिण दिशेकडे जाते. यामुळे घरातील नकारात्मकता किंवा नकारात्मक ऊर्जा वाढीस लागते. म्हणून दक्षिण दिशेला घड्याळ लावू नये, असा सल्ला दिला जातो.

## सल्ला

शिळ्या पोळ्या अनेक प्रकारच्या रेसिपीमध्ये वापरल्या जाऊ शकतात. त्या दह्याबरोबर, भाजी किंवा डाळीबरोबर किंवा पिझ्झा, शीरा, सँडविच यांसारख्या पदार्थांमध्ये देखील वापरल्या जाऊ शकतात.

## सौंदर्य

साडीच्या कापडाचा वापर करुन सुंदर आणि स्टायलिश गाऊन बनवता येतात, जे पार्टी किंवा विशेष कार्यक्रमासाठी योग्य आहेत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**शनिवार, दि. २४ मे २०२५**

**शनिप्रदोष, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, रेवती १३।४८, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील. जोखिम अंगलट येईल.

**वृषभ** : जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होईल.

**मिथुन** : सामुदायिक कार्यांमध्ये स्थिती अनुकूल राहिल.

**कर्क** : वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. पत्नीपासून सुख मिळेल.

**सिंह** : गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. खरेदी-विक्रीत लाभ मिळण्याची स्थिती बनेल.

**कन्या** : व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**तूळ** : आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढेल.

**वृश्चिक** : वैवाहिक सुख वाढेल. सहलीला परराज्यात जाल.

**धनु** : एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल मात्र शत्रू प्रभावहीन पडतील.


**मकर** : आजचा दिवस आपणास व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**कुंभ** : आपला निष्काळजी दृष्टीकोण आज चांगला ठरणार नाही. व्यापारात मोठे नुकसान होईल.

**मीन** : नवीन वास्तू घरेदीसाठी दिवस उत्तम. उधारी उसनवारी वसुल होईल. हितशत्रू नांग्या टाकतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**


## शब्दगंध क्र. ७१८३ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) जिल्ह्याचे ठिकाण असलेले पंजाबमधील एक शहर ४) दिन; वासर; दीस ६) सर; हार; माळ; माला ७) समुद्र; मर्यादा; अंत ९) बेकरीत तयार होणारा एक गोड पदार्थ ११) बुद्धिबळ, सोंगट्या वगैरे ज्यावर खेळतात ते विशिष्ट आकाराचे कापड १३) पात्र; कार्यक्षम १४) दारू पिणारा; दारूड्या १६) गृह; गेह; निवासस्थान १७) गुंतागुंत १८) एक वृक्ष; वडाचे झाड १९) पैसा; अडका २०) गावात तयार झालेले २२) अंत:करणाची जागृत स्थिती; शुद्धी; चैतन्य २३) एक प्रकारचा जुगार २४) स्त्रीचे एक नाव; गायनातील एक राग

**उभे शब्द :-** १) जिल्ह्याचे ठिकाण असलेले मराठवाड्यातील एक शहर २) इंग्लंडची राजधानी ३) तडाखा; रट्टा; प्रहार ४) दीप; दीपक ५) लग्नातील नवरदेवाकडील मंडळी ८) तेल निघणारे एक धान्य; मोहरी १०) कुंकू वगैरे ज्यात ठेवतात ते पात्र, मोठी टोपली १२) एक प्रकारची घोडागाडी १३) माळ; हार; बरोबरी; तुलना १४) नियंत्रण नसलेला; अनियंत्रित १५) एकसारखे बोलणे; बडबड; बकबक १६) घडा; तोटा; हानी; नुकसान १८) अरण्य; जंगल; रान १९) राक्षस; दैत्य; असुर २१) पौर्णिमा (संस्कृत) २२) फेकून मारण्याचे एक शस्त्र

**शब्दगंध क्र. ७१८२ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११८९ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : सदैव स्वत: झुकून इतरांना मोठेपणा देण्यात आनंद मानणे म्हणजेच संस्कार होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आईस्क्रीमचा शोध कधी व कोणी लावला?

आईस्क्रीमला खरी प्रसिद्धी १७ व्या शतकातच मिळाली. त्या काळात इटली आणि इतर भागांमध्ये आईस्क्रीमचे वेगवेगळे प्रकार बनवले जात होते. जगातील पहिले 'आईस्क्रीम कॅफे' पॅरिसमध्ये १७ व्या शतकाच्या सुरुवातीला उघडल्या गेले. दुसऱ्या महायुद्धात मनाने हताश व निराश झालेल्या सैनिकांचे मनोबल वाढवणारा पदार्थ म्हणून आईस्क्रीमचं एक नवं नातं जुळलं होतं. या महायुद्धात भाग घेतलेल्या अनेक देशांनी त्यांच्या सैनिकांना आईस्क्रीम खाऊ घालण्याचा प्रयत्न केला होता, असा संदर्भ आढळतो.

दक्षिण आशियामध्ये आईस्क्रीमचं आगमन मुघलांसोबत झालं. मुघल सम्राट सोळाव्या शतकाम ध्ये हिंदुकुश पर्वतरांगांमध्ये बर्फ आणण्यासाठी घोडेस्वारांना पाठवत असत. तेव्हा हे दिल्लीच्या शाही दरबारांमध्ये 'फळांचं सरबत' म्हणून दिले जात असे. आपण जी कुल्फी चवीने खातो, तिचा शोधही मुघल काळातच लागला होता.

भारतात आईस्क्रीमची सुरुवात ही सॉर्बेच्या रुपात झाली. सॉर्बे म्हणजे 'बर्फाळ पाणी'. त्यात आपल्या आवडत्या फळाचा रस किंवा त्याचे छोटे छोटे तुकडे आणि साखर एकत्र करून त्याला थंड केल्यावर हा फ्लेवर्ड बर्फ खाणे याला सॉर्बे म्हणतात. सॉर्बे हा पदार्थ मुघलांनी भारतात आणला. त्यावर त्यांनी भरपूर प्रयोग केले. सुका मेवा आणि दूध हे पदार्थ मुघलांच्या आवडीचे असल्यामुळे त्यांनी बर्फाळ पाण्यात ते सगळं टाकून त्यापासून कुल्फी तयार केली. अशाप्रकारे भारतात कुल्फीचा जन्म झाला. भारतातील 'कुल्फी' हा आईस्क्रीमचाच एक पदार्थ आहे. असंही सांगितलं जातं की भारतीय लोकांना हा पदार्थ तयार करण्याची प्रेरणा 'बस्टानी सोनाटी' या पदार्थापासून मिळाली होती. भारतात आईस्क्रीम पहिल्यांदा कुल्फीच्या रुपात आलं असलं तरी ग्रीक, पर्शियन, रोमन आणि चीनच्या खाद्य संस्कृतीत ते वेगवेगळ्या नावाने आणि रूपाने अस्तित्वात होतंच. कालांतराने ह्यात बदल होत गेले. तंत्रज्ञान जसजसे विकसित झाले तसतसे आईस्क्रीमचे स्वरूपही बदलत गेले. आईस्क्रीम थोरामोठ्यांची मक्तेदारी न राहता आईस्क्रीमचं उत्पादन सर्वसामान्य लोकांपर्यंत आलं. पण कालौघात कायम लक्षात राहिले ते या पदार्थाविषयीचे प्रेम! आज आईस्क्रीमचे कितीतरी फ्लेवर जगभरात उपलब्ध आहेत. (समाप्त)

### पद्मनाभ

कश्यप नावाचे महातपोनिधी ऋषी होते. इंद्र हा त्यांचाच पुत्र. कश्यपांची एक पत्नी दिती हिला वज्रनाभ व सुनाभ अशी दोन मुले होती. दोघेही अत्यंत शूर व शक्तिशाली. मेरू पर्वतावर वज्रपुरी नावाची एक भव्य व सुंदर नगरी त्यांनी राजधानी म्हणून वसवली व थोरला वज्रनाभ तेथे राज्य करू लागला. पण एवढ्याने त्याचे समाधान होईना. संपूर्ण पृथ्वी व स्वर्गाचेही राज्य मिळावे यासाठी त्याने ब्रह्मदेवाची घनघोर भक्ती केली. आपल्या योगबलाने ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेऊन त्याने वर मागितला, की माझे राज्य संपूर्ण पृथ्वी व स्वर्ग यांना व्यापू दे. तसेच देव, मनुष्य, राक्षस, पशू, पक्षी यांच्याकडून माझा मृत्यू घडू नये. तथास्तु! असे म्हणून ब्रह्मदेव सत्यलोकी गेले.

आता वज्रनाभ उन्मत्त झाला. त्याने सर्व पृथ्वी जिंकून सर्व राजांना बंदी केले. नंतर तो देवेंद्राच्या अमरावतीस गेला व राज्य मागू लागला. अन्यथा युद्ध करण्याचे त्याने आव्हान दिले. वज्रनाभचे ते भयंकर स्वरूप पाहून देवेंद्र भयभीत झाला. युक्तीप्रयुक्तीने ही वेळ टळावी म्हणून गोड स्वरात तो वज्रनाभला म्हणाला, तुझे मागणे योग्य आहे, पण माझा राज्यकारभार मी गुरू बृहस्पती यांच्या सल्ल्याने चालवतो. तेव्हा त्यांना विचारून कळवतो. विचार करून बृहस्पती म्हणाले, ब्रह्मदेवाच्या वरामुळे वज्रनाभ बऱ्याच अंशी चिरंजीव झाला आहे. तेव्हा हरिश्चंद्र राजाने बुद्धिबळाने जसे आपल्या पुत्राचे रक्षण केले, तसे युक्तीने हे युद्ध टाळले पाहिजे. बृहस्पतीच्या सांगण्यावरून इंद्राने वज्रनाभाला बोलावून घेतले व दोघेही आपले वडील कश्यप ऋषी यांच्याकडे गेले. कश्यपासही कोणाची बाजू घ्यावी असा पेच पडला. तेव्हा ते म्हणाले, पुत्रहो, हल्ली मी यज्ञदीक्षा घेतली असल्याने या गोष्टीचा विचार मला आता करता येणार नाही. माझा यज्ञ पुरा होईपर्यंत दोघांनी स्वस्थ राहावे. नंतर मी हे भांडण मिटवीन.

पुढे योगायोगाने वज्रनाभाची कन्या प्रभावती हिने श्रीकृष्णाचा मुलगा प्रद्युम्न याच्याशी वज्रनाभाच्या इच्छेविरुद्ध गुप्तपणे लग्न केले. त्यामुळे संतापलेल्या मदनाशी युद्ध आरंभले. घनघोर युद्ध झाले. श्रीकृष्णाचे सर्व यादववीर तसेच इंद्राचे सैन्य मदनाच्या मदतीस आले. शेवटी श्रीकृष्णाने गरुडाकडून सुदर्शनचक्र पाठवून मदनाकडून वज्रनाभास युक्तीने मृत्युपंथास धाडले. वज्रनाथ हत झाल्यावर इंद्राने त्यास स्वर्गात नेले व तेथे त्याचे नाव पद्मनाभ असे ठेवले.

## जीवन का अमृत (भाग १)



इससे उनको शक्ति मिली। तुम भी ऐसा ही कर सकते हो। यह तो शुरुआत करने की बात है। अभी से शुरू कर दो। सत्गुरु तुमको आगे बढ़ता देखने को बेचैन है। वह चाहता है कि उसके दीक्षित ऊँचे उठें और उनका बर्तन प्रभु की चेतनता के अमृत से लबालब भर जाए। पर पहले पात्र भी गंदगियों से रहित होने चाहिये, ताकि उसमें प्रभु का अमृत समा सके।

ऐसी सोहबत ढूँढो, जो इस रास्ते में सहायक हो । बाकी सब सोहबत को, प्यार और नम्रता से छोड़ दो, आप जरूर आगे बढ़ोगे । पर याद रखो, रोम (एक शहर) एक दिन में नहीं बना था। उसके लिए हजारों-लाखों लोगों लम्बे समय तक कड़ी मेहनत की। ने बहुत हो सकता है आपको इतने कड़े अनुशासन की जरूरत न पड़े, पर आप जो चाहते हैं (परमार्थ के लिहाज से), वह इतनी आसानी से

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

नहीं मिल सकता। आपको इसके लिए मेहनत करनी होगी। पर आश्वस्त रहो कि आपकी थोड़ी सी कोशिश से भी आपको बेहतर नतीजा मिलेगा। सत्गुरु चाहता है कि आप सब प्रेम और नम्रता का विकास करें। इनके साथ-साथ सहनशीलता भी होनी चाहिए। खेद की बात है कि ये सद्गुण उन लोगों में नहीं हैं, जिनके संपर्क में आप आते हो। पर यह कोई ऐसा कारण नहीं. जिसकी वजह से कोई भी गलत रास्ते पर चल दे। आध्यात्म विज्ञान बहुत पक्का रास्ता है और जो कोई भी, चाहे वह कितना भी बुरा क्यों न हो, इस पर चलेगा, वह सुधर जाएगा। अगर कुछ लोग, जिनको यह रास्ता बता दिया गया है, नहीं सुधरते हैं, तो यह पूर्णतया उन लोगों की ही गलती है, इस विज्ञान की नहीं ।

यह सबसे पूर्ण रास्ता है, जो कि सब संतो और महात्माओं ने, जो आज तक आए हैं, बताया है। जिन बातों का हम प्रचार करते हैं, हमारी रोजमर्रा की जिंदगी उन सबका जिंदा उदाहरण होनी चाहिए। यही सब बातों का सार है। हमें ऐसे, प्रचारकों की बड़ी भारी ज़रूरत है, जो औरों को नहीं, बल्कि खुद को सुधारें । दूसरों में बुराइयाँ देखने से यह ज्यादा अच्छा है कि हम अपनी कमियों को पहचानें और उन्हें सुधारें । ५. आपने मुझसे भारत आकर सत्गुरु के चरण कमलों में बैठने की इजाजत माँगी है। कैसे एक दयालु पिता अपने प्यारे बच्चों को ऐसी प्यारी बात के लिए मना कर सकता है, जबकि ऐसा करना बच्चों का जन्म- सिद्ध अधिकार है। गुरु और उसकी साध-संगत आपका स्वागत करके बहुत खुश होगी। पर मैं आपको आपका आध्यात्मिक कर्तव्य याद दिलाना चाहूँगा, जिसे आप अमरीका में खुशकिस्मती से निभा रहे हैं। यदि आपके पास आने की फुर्सत हो, तो आप यह यात्रा कर सकते हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

आप को तुरंत खुशी आयेगी और परिणाम सुंदर होंगे।

आकाश में एक सूक्ष्म तत्व है जिसे ईथर कहते हैं। हम जो विचार करते हैं तो हमारे आसपास लहरें बनती हैं। ये लहरें ईथर में चली जाती हैं, जिस से सारे आकाश में फैल जाती हैं। यही कारण है कि ऋषिओं के आश्रमों के निकट सभी जानवर अहिंसक हो जाते थे । इन अदृश्य तरंगों के आगे बड़े बड़े बली तथा धनाढ्य भी हार जाते हैं। इसे ही आत्म तेज कहते हैं। जो व्यक्ति इन तरंगों के क्षेत्र में आ जाता है उनसे प्रभावित हुए बिना नहीं रह सकता। हमारे विचार छोटे-छोटे परमाणुओं से बने होते हैं। विचार के सूक्ष्म अणु बहुत शक्तिशाली होते हैं।

अगर विचारो के पीछे दृढ़ इच्छा शक्ति का बल है तो यह दूर दूर तक बहुत तीव्र प्रभाव डालेगें। अगर इच्छा शक्ति का बल कम है तो इसका प्रभाव भी दूसरों पर कम होगा। अगर आप सत्य पर भाषण

### विशुद्ध ऊर्जा चक्र

करते हैं और वास्तव में आप झूठे हैं तो इन विचारों का प्रभाव नाम मात्र होगा। लोग झूठ बोलना नहीं छोड़ेगें। आप पवित्रता पर समझाते हैं परंतु मन में पवित्रता नहीं है तो लोग पवित्रता नहीं अपनायेगें। जो अपनायेगें भी तो उनके मन में खुशी नहीं होगी। अगर आप राज नेता की तरह एक दो के पीछे जासूस लगाये रखते हैं, पीठ पीछे निंदा करते हैं, अभिमान में रहते हैं, दूसरो को कुचलने, घर का रास्ता दिखाने, दूसरो को सादगी से रहना सिखाते हैं परंतु खुद सैर सपाटे का कोई चान्स नहीं गंवाते हैं, फूट डालते रहते हैं, जिस से विचार नहीं मिलते, उसे आगे नहीं बढ़ने देते हैं, तो आप की इच्छा शक्ति कमजोर रहेगी। यही वातावरण में फैलेगा। जिस की प्रतिक्रिया यह होगी कि आप से लोग दूर भागेगें। सहयोग नहीं देगें। विचार के सूक्ष्म परमाणु मन से जो सोचा उसे अपने में लेकर प्रकाशित हो जाते हैं और पूरे ब्रह्माण्ड में चले जाते हैं क्योंकि ईथर हमारे दिमाग में भी है। ये जो

हम सोचते हैं, विचार करते हैं यह ईथर तत्व में करते हैं, ये सोच सारे विश्व में पहुंचता रहता है। समझ ईथर तत्व के आगे दूरी और समय कोई बाधा नहीं है जिसके बारे अच्छा या बुरा सोचते हैं, ईथर के माध्यम से सोचते ही विचार उस व्यक्ति के पास पहुंच जाते हैं। वह अपने दिमाग में उन शब्दों का भाव लेता है तथा अच्छा बुरा रिएक्ट करता है। वह हमारे हूबहू शब्द नहीं समझता परंतु हमारा उदेश्य समझ जाता है। विचार लेने वाले मन की वही दशा हो जाती है जैसे भेजने वाले के मन की होती है। ये सब ईथर की वजह से होता है क्योंकि ईथर मन के विचारों का सुचालक है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक मुलगा लग्नासाठी पुण्यात मुलगी पाहायला जातो.

मुलगा : मला ना, काटकसर करणारी मुलगी हवी आहे.

मुलगी : मी साखरेच्या बिस्किटांवरची साखर काढून चहाला वापरते

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतात लोटस् मंदिर कोठे आहे?

– नवीदिल्ली

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

पण असे करू नये, कारण बालकाचे दिवसातून सहा ते आठ वेळा पातळ मलप्रवृत्ती करणे हे सामान्य आहे. आणि जर बालक प्रसन्न असेल, स्तनपान व्यवस्थित करीत असेल, खेळत असेल, त्याचे वजन वाढत असेल, तर बालकाने कितीही वेळा जुलाब केले, तरी चिंता करू नये. परंतु काही वेळेला बालक दिवसातून दोन-तीन वेळाच पातळ शी करीत असेल किंवा जास्त प्रमाणत करीत असेल, बालक हा थकून गेल्यासारखा वाटत असेल, स्तनपान करत नसेल, खेळण्यात मन लागत नसेल, तर अशा वेळी त्वरित डॉक्टरांकडे जाऊन उपचार करून घ्यावेत. कारण काही बालकांमध्ये एक ते दोन वेळा जरी पातळ शी झाली, तरी लगेचच

### बालकांचे आजार

वरील लक्षणे दिसून येतात. तर काही बालकांमध्ये दिवसातून सहा ते आठ वेळा पातळ शी केली, तरी लक्षणे दिसून येत नाहीत. बाळ चांगले खेळत असते. अनेक वेळा दात निघण्याच्या काळात बालक जास्त वेळा शी करते. तथापि बालकाला काहीच त्रास होत नसेल, तर काळजी करू नये. मात्र बालक गळून गेले असेल, तर लगेचच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नवजात बाळाला बिल्वमज्जाचूर्ण १२५ मि.ग्रॅम दोन वेळा द्यावे किंवा जायफळ व सुंठ पाण्यात दोन ते तीन वेळा उगाळून मधातून चाटण द्यावे. नवजात बाळाला जुलाब होताना रक्त पडत असेल, तर बालकुटजावलेह ५ मि.लि. दोन वेळा द्यावे.

६) सहा महिन्यांच्या पुढील बाळाला कुटजारिष्ट ५ मि.लि. दोन वेळा किंवा कुटजघनवटी बारीक करून दोन वेळा द्यावी. यासोबत बाळ उलटी करत असेल, तर घरी तयार केलेली जलसंजीवनी पण द्यावी.

७) दात निघत असल्यामुळे जुलाब होत असतील, तर दन्तोदभेदगदान्तकरस द्यावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# खुल्या जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे १ जून रोजी लोणी येथे होणार उद्घाटन

### सहभागी होण्याचे आवाहन



नगर – अहिल्यानगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्यावतीने १६ वर्षांवरील पुरुष व महिला खुल्या गटातील मैदानी ॲथलेटिक्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन १ जून रोजी सकाळी ८ वाजता लोणी येथील पी. व्ही. पाटील (सिनियर) महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे.

या स्पर्धेत जिल्ह्यातील सर्व खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून, ही स्पर्धा फक्त जिल्ह्यातील खेळाडूंसाठी मर्यादित आहे. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विजेते खेळाडू गुणवत्ता प्रमाणपत्राच्या मानकरी ठरणार आहेत. याशिवाय, या गुणवंत खेळाडूंची पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे.

राज्यस्तरीय स्पर्धा २१ ते २२ जून दरम्यान पुणे किंवा मुंबई येथे आयोजित केली जाणार आहे. राज्य गुणवत्ता प्रमाणपत्र ५% नोकरी राखीव कोट्यात उपयोगी ठरणार आहे. तसेच, राज्य व जिल्हा स्तरावरील सहभाग प्रमाणपत्र लष्कर भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरणार आहे.

प्रवेश अर्ज ऑफलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार असून, स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. सर्व खेळाडूंनी ओरिजिनल आधार कार्ड अनिवार्यपणे सोबत आणावे. भालाफेक व हातोडाफेक या प्रकारात सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी स्वतःचा भाला व हातोडा बरोबर आणणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी दिनेश भालेराव: ९२२६२३८५३६, राहुल काळे: ८८३०८६३११६ व संदीप हारदे: ९६५७६०३७३२ यांच्याशी संपर्क करण्याचे म्हटले आहे.

या खुल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत पुढील क्रीडा प्रकारांचा समावेश आहे: धावणे– १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, ८०० मीटर, १५०० मीटर, ५००० मीटर, १०००० मीटर., चालणे, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, हातोडाफेक आणि लांबउडी, तिहेरी उडी.

# राजशिष्टाचाराचे पालन न झाल्याबद्दल जिल्हा न्यायालयात अहमदनगर बार असोसिएशनच्यावतीने निषेधाचा ठराव

### अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करा



सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांच्या मुंबई भेटी दरम्यान सरकारी अधिकाऱ्यांकडून राजशिष्टाचाराचे पालन न झाल्याबद्दल जिल्हा न्यायालयात अहमदनगर बार असोसिएशनच्यावतीने निषेधाचा ठराव घेण्यात आला.

नगर – सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांच्या मुंबई भेटी दरम्यान सरकारी अधिकाऱ्यांकडून राजशिष्टाचाराचे पालन न झाल्याबद्दल जिल्हा न्यायालयात अहमदनगर बार असोसिएशनच्यावतीने निषेधाचा ठराव घेण्यात आला.

विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांच्या अध्यक्षतेखाली बार असोसिएशनने तातडीची बैठक बोलवली होती. यामध्ये सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या भेटी दरम्यान राजशिष्टाचाराचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांचा निषेध करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी असा ठराव संमत करण्यात आला.

ठराव ॲड. महेश काळे यांनी मांडला. त्याला बारच्या वतीने ॲड. रफिक बेग यांनी अनुमोदन दिले. यावेळी ॲड. राजेश कावरे, माजी उपाध्यक्ष ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड.रावसाहेब बर्डे, ॲड. पी. डी. शहाणे, ॲड. हाजी रफिक बेग, ॲड.रामेश्वर कराळे, ॲड. ज्ञानेश्वर दाते, ॲड.आनंद सूर्यवंशी, ॲड. महेश काळे, ॲड. रघुनाथ शेळके, ॲड.वरद शिंदे, ॲड. अशोक पालवे, ॲड.समीर शेख, ॲड.संजय दराडे, ॲड.सतीशचंद्र सुद्रिक, ॲड. योगेश थोरात, ॲड. साबीर सय्यद, ॲड. बाबासाहेब रणसिंग, ॲड. व्ही.एस. शिंदे, ॲड. संजय दुशिंग, ॲड. अमित गाडेकर, ॲड. अभिषेक पगारिया, ॲड. सुरेश भोर आदींसह वकील मंडळी उपस्थित होती.

न्यायमुर्ती भूषण गवई हे महाराष्ट्रातील एकमेव न्यायमूर्ती असून, त्यांची एवढ्या मोठ्या उच्च पदावर सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती होणे ही सर्व महाराष्ट्रासाठी भूषणावह बाब आहे. एवढ्या मोठ्या उच्च पदस्त न्यायमूर्तींबाबत राजशिष्टाचार पाळला जाऊ नये, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. राजशिष्टाचार न पाळणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी यांना दोषी धरून त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या निषेधाचा ठराव करणारा अहिल्यानगर जिल्हा राज्यातील एकमेव असल्याचे ॲड. सुरेश लगड यांनी सांगितले. उपस्थितांनी देखील या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करुन संतापजनक भावना व्यक्त केल्या.

# विचार भारती व जनसेवा फाउंडेशनतर्फे पद्मविभूषण अण्णा हजारे, पोपटराव पवार व राहीबाई पोपरे यांना अहिल्यानगर गौरव पुरस्कार

### ३१ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते होणार वितरण



नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दीनिमित्त विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या वतीने अहिल्यानगर गौरवदिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन २९ ते ३१ मे दरम्यान करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पद्मविभूषण अण्णा हजारे, पद्मश्री पोपटराव पवार व पद्मश्री राहीबाई पोपरे यांना राज्यस्तरीय अहिल्यानगर गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. ३१ मे रोजी होणाऱ्या पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या समारोप समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधानपरिषदेचे सभापती सभापती राम शिंदे तर प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे उपस्थित राहणार आहेत. सावेडीच्या माऊली सभागृहात संध्याकाळी ६ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे, अशी माहिती महोत्सवाचे सचिव अनिल मोहिते व स्वागताध्यक्षा धनश्री विखे यांनी दिली.

विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे म्हणाले, महोत्सवानिमित्त ३ दिवस नगरकरांना विविध कार्यक्रमांची मेजवानी मिळणार आहे. या सोहळ्यात २९ मे रोजी शहरातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व संत महंत, सर्व ऐतिहासिक स्थळांची ओळख करून देणारे चित्ररथांचा समावेश असणार आहे. ३० मे रोजी माऊली सभागृहात होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार ह्यांच्या हस्ते आणि महिला बाल कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर ह्यांच्या उपस्थितीत होणार आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमात स्थानिक कलाकार जिल्ह्याची ऐतिहासिक व धार्मिक महिमा नाट्य, नृत्य व गायनातून सादर करणार आहेत. ३१ मे रोजी सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रा.राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आदींच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. यावेळी महिला सबलीकरण काळाची गरज यावर हिंदुत्ववादी प्रवक्त्या काजल हिंदुस्तानी यांचे व्याख्यानाचे आयोजन सायंकाळी ६.३० ते ८ या वेळेत करण्यात आले आहे. तसेच रात्री ८ वाजता 'राष्ट्र समर्थ देवी अहिल्या की पुण्यगाथा' या हिंदी नाटिकेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन महोत्सवाचे उपाध्यक्ष निखिल वारे व धनंजय जाधव, निमंत्रक बाबासाहेब वाकळे यांनी केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न पुरस्कार अहिल्यानगर येथील आबासाहेब सोनवणे यांना जाहीर



नगर – हिंगणगाव (ता. नगर) येथील प्रथम लोकनियुक्त सरपंच तथा सरपंच परिषदचे (मुंबई) राज्य कोअर कमिटी अध्यक्ष आबासाहेब सोनवणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. अहिल्यादेवी फाउंडेशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड व कार्याध्यक्ष महादेव महानोर यांनी दिली.

अहिल्यादेवी फाउंडेशन यांच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा वितरणाचे आयोजन २५ मे रोजी सकाळी १० वाजता, निर्मिती लॉन्स, विजापूर रोड, सोलापूर येथे पार पडणार आहे. या सोहळ्यात सोनवणे यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून आमदार प्रकाश शेंडगे, तर प्रमुख पाहुणे म्हणून आयकर आयुक्त (पुणे) डॉ. नितीन वाघमोडे, आयकर आयुक्त (मुंबई) डॉ. सचिन मोटे, सहाय्यक पोलीस आयुक्त (पुणे) रुक्मिणीताई गलांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त राम मांडूरले, तनिष्का फाउंडेशनचे अनिल भीमराव जाहीर, मिसेस इंडिया श्वेता परदेशी, रिल स्टार प्राजक्ता मालुंजकर उपस्थित राहणार आहे.

आबासाहेब सोनवणे यांनी गेल्या २५ वर्षे पंचायत राज व्यवस्थामध्ये सरपंच व सदस्य म्हणून काम पाहिले आहे. कृषी, जलसंधारण, पंचायत राज व्यवस्था बळकटीकरण, दुष्काळी गावाची ओळख पुसून पाणीदार हिंगणगाव ओळख निर्माण केल्याचे कार्य त्यांनी केले आहे.

गावाशी जोडणारे सर्व रस्ते मजबुतीकरण, डांबरीकरण करुन शेतपानंद शिवार रस्ते मुक्त करून वहिवाटीस खुले करण्यास महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत पेयजल योजना राबवणे, गावातील प्राथमिक शाळा खोल्यांचे आरसीसी बांधकाम, पेव्हिंग ब्लॉक बसवणे, पशुवैद्यकीय दवाखाना इमारत, सुसज्ञ असे अमरधाम, वृक्षारोपण आदी विकासात्मक व सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. कोरोना काळात झोकून काम करून आरोग्याच्या सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. सांगली सातारा पूरग्रस्तांना मदत आदी त्यांच्या विविध क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी कार्यक्रमाच्या संयोजकपदी निशांत दातीर व अनिल ढवण यांची निवड



नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्ताने आगामी वर्षभर भाजपच्या वतीने राज्यभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या विषयावर नुकतीच मुंबई येथील वसंत स्मृती कार्यालयात बैठक झाली. यात अहिल्यानगर येथील संयोजन समितीमध्ये निशांत दातीर व अनिल ढवण यांनी निवड करण्यात आली आहे.

जयंती निमित्ताने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी निर्माण केलेले घाट, बारव, मंदिर व त्यांची स्मारक स्वच्छता अभियान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील चित्र रथ, शोभा यात्रा महिला मेळावे, युवा मेळावे, महिला मॅरेथॉन, पथनाट्य वकृत्व स्पर्धा, निबंध लेखन, अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर आधारित सामाजिक महिला व सोशल मीडियातील प्रभावी व्यक्तीचे संमलेन आदी कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे.

# कुटुंब हाच व्यक्ती विकासाचा पाया आणि भविष्य

### संकेत शेगावकर



जागतिक कुटुंब दिनाच्या निमित्ताने १८ मे रोजी स्नेहालय संस्थेच्या कुटुंब आधारित सेवा प्रकल्पाच्या (फॅमिली बेस्ड केअर) वतीने स्नेहालय पुनर्वसन संकुल चखऊ येथे जागतिक कुटुंब दिवस साजरा करण्यात आला.

नगर – जगभरात होत असलेले शहरीकरण आणि कुटुंबांचे विघटन यांचा प्रभाव भारतावरही पडला असून आपली पारंपारिक कुटुंब व्यवस्था कमकुवत होत आहे. कुटुंब हाच व्यक्ती विकासाचा पाया आणि भविष्य असल्याने कुटुंब व्यवस्था टिकवण्याचा संकल्प सर्वांनी करायला हवा, असे प्रतिपादन मिरॅकल फाउंडेशन इंडिया संस्थेचे प्रशिक्षण सहाय्यक संकेत शेगावकर यांनी केले.

जागतिक कुटुंब दिनाच्या निमित्ताने १८ मे रोजी स्नेहालय संस्थेच्या कुटुंब आधारित सेवा प्रकल्पाच्या (फॅमिली बेस्ड केअर) वतीने स्नेहालय पुनर्वसन संकुल MIDC येथे जागतिक कुटुंब दिवस साजरा करण्यात आला. त्यास उद्घाटक म्हणून श्री. शेगावकर उपस्थित होते.

संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त राजीव गुजर, संजय बंदिष्टी, संस्थेच्या सचिव डॉ. प्रीती भोम्बे, विश्वस्त सपना असावा, खजिनदार गीता कौर, इंग्लंड येथून अहिल्यानगर येथे स्थायिक होऊन गेली ११ वर्षे स्नेहालय संस्थेलाच आपले कुटुंब मानणारे ज्येष्ठ भारत सेवक निक कॉक्स, येथील विधी सेवा प्राधिकरणाच्या न्यायाधीश भाग्यश्री पाटील आणि स्नेहालय संस्थेतील विद्यार्थ्यांचे नातेवाईक, माजी विद्यार्थी अशांची या कार्यक्रमास उपस्थिती होती.

स्नेहालय संस्थेतील मुले आणि त्यांचे पालक तसेच अनाथ मुलांचे दूरचे नातेवाईक यांच्या मधील प्रेमबंध दृढ करणारे अनेक उपक्रम यावेळी. दिवसभर आयोजित करण्यात आले होते. कुटुंबाचे महत्व या संकल्पनेवर आधारित विविध सांस्कृतिक, आणि सामाजिक उपक्रम, स्पर्धा यावेळी झाल्या.

गिरीश कुलकर्णी म्हणाले की, स्नेहालय संस्था हे एक कुटुंब आहे. संस्थेतील मुले व कर्मचारी हे सर्व एका कुटुंबां प्रमाणेच एकत्रित राहतात. मुल संस्थेमध्ये राहत असेल तरी त्याला हक्काच्या एका कुटुंबाची गरज असतेच. कुटुंबाचे प्रेम माया व जिव्हाळा प्रत्येक मुलाचा अधिकार आहे.

निक कॉक्स म्हणाले की, स्नेहालय संस्थेमध्ये राहत असताना मला भाऊ. काका, वडील, आजोबा अशी विविध नाती मिळाल्याने माझे जीवन आशयसंपन्न झाले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कुटुंबाच्या महत्वावर नृत्य–नाटिका, गीत यांचे सादरीकरण केले. पालक व मुले यांचे विविध खेळ घेण्यात आले.

सूत्रसंचालन जयश्री देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या संयोजनात अनिल गावडे, हनिफ शेख, प्रविण मृत्याल, अशोक अकोलकर, समाधान धालगुडे, प्रकल्प समन्वयक सागर भिंगारदिवे, समुपदेशक प्रियंका कोंगळे, गायत्री इंगळे, शितल पिठाले, मंगेश घ्यार यांनी योगदान दिले.

जळगाव जिल्ह्यातील धनाजी नाना चौधरी विद्याप्रबोधिनी संचालित मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवकही यात सहभागी झाले.

# शासनाच्या कौशल्य विकास कार्यक्रमाच्या मोफत प्रशिक्षणाच्या सुविधेचा लाभ घ्यावा



विनायक देशमुख

नगर – केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत विविध विषयांचे प्रशिक्षण मोफत उपलब्ध आहे, अशी माहिती कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाला विश्वगुरू बनविण्याच्या उद्देशाने प्रशिक्षण व रोजगार निर्मितीवर विशेष भर दिला आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमावर विशेष लक्ष केंद्रीत केले असुन अहिल्यानगर जिल्ह्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील प्रशासन जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कार्यरत झाले आहे.

केंद्र सरकार व राज्य सरकार मार्फत कौशल्य विकासाच्या विविध योजना राबविल्या जातात. हे सर्व कार्यक्रम १५ ते ४५ वर्षे वयोगटातील पात्र लाभार्थ्यांसाठी विनामूल्य उपलब्ध आहेत. या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी लाभार्थींचे आधार कार्ड व फोन नंबर लिंक असणे आवश्यक आहे. सध्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना यासारखे महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविले जात आहेत. पंतप्रधान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत ३००० पेक्षा जास्त व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध आहे. यात प्रामुख्याने टेक्स्टाईल, परल, हँडीक्राफ्ट व कार्पेट, जेम्स व ज्वेलरी, बांधकाम, प्लंबिंग, ब्युटी व वेलनेस, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, इन्स्ट्रुमेंटेशन, ऊर्जा, रिटेल, टेलीकॉम, टुरिझम व हॉस्पिटॅलिटी, लॉजिस्टिक, मीडिया व इंटरटेनमेंट, हेल्थकेअर अशा विविध विभागांचा समावेश आहे. हे प्रशिक्षण सरासरी ४ ते ६ महिने कालावधीचे असून प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर केंद्र सरकार मार्फत प्रमाणपत्र दिले जाते. त्या आधारे लाभार्थ्यांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. तसेच जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्रामोद्योग मंडळ, मुद्रा योजना अशा विविध योजनांद्वारे स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध होऊ शकते.

वरील क्षेत्रातील अनुभव, आवश्यक ते ज्ञान व पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या पात्र व्यक्ती आणि संस्था कौशल्य विकास कार्यक्रमासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करू शकतात. याशिवाय इयत्ता अकरावी व बारावीचे वर्ग सुरू असलेली कनिष्ठ महाविद्यालय आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र सुरू करू शकतात. अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र सुरू करू इच्छिणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांनी ९४२२२२२६९५ या क्रमांकावर संपर्क साधावा. अहिल्यानगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी या योजनेच्या लाभ घेऊन स्वतःचे भवितव्य घडवावे, असे आवाहन विनायक देशमुख यांनी केले आहे.

# सारडा वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु

नगर – हिंद सेवा मंडळाच्या रामकरण सारडा वसतीगृहामध्ये इयत्ता ५ वी ते १० वी मधील मागासवर्गिय विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. अनुजाती, अनुजमाती व भटक्या व विमुक्त जाती जमातीच्या विद्यार्थ्यांनी रामकरण सारडा विद्यार्थी गृह सिव्हील हडको सावेडी रोड अहिल्यानगर मो. ९६३७७९०९६५ या क्रमांकावर अधिक्षक बंडू भोसले यांच्याकडे १० ते सायंकाळी ५ या वेळेत समक्ष संपर्क साधावा.

यामध्ये विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीयुक्त प्रशस्त इमारत, जेवणाची व राहण्याची तसेच शालेय गणवेश, शालेश साहित्य व विद्यार्थ्यांसाठी मोफत स्कूल बसची व्यवस्था करण्यात आली आहे. गरजू विद्यार्थ्यांनी वसतीगृहात संपर्क साधावा असे आवाहन चेअरमन श्यामसुंदर सारडा व सचिव अजित बोरा यांनी केले आहे.

# अहमदनगरच्या स्थापना दिनानिमित्त दुर्मिळ वस्तूंचे व गड किल्ल्यांचे चित्र प्रदर्शन



नगर – अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनाचे औचित्य साधत मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, इतिहास प्रेमी मंडळ व रहमत सुलतान फाउंडेशनतर्फे अहमदनगरचे नाणी संग्राहक सचिन डागा व १५० पेक्षा जास्त गड किल्ल्यांची भ्रमंती करुन त्यांची उत्कृष्ट फोटोग्राफी करणारे ठाकुरदास परदेसी यांच्या फोटो प्रदर्शनाचे आयोजन २५ व २६ मे रोजी सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत सर्जेपुरा येथील रहमत सुलतान सभागृहात आयोजित करण्यात आली असल्याचे मख़दुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान यांनी सांगितले.

प्रदर्शनात जुने ऐतिहासिक नकाशे, जुनी कागदपत्रे, जुने संस्थानिक राजांची तिकिटे, पोस्टाची तिकिटे, जुने कॉइन्स, निजामशाही शिवशाही ब्रिटिशकालीन जुन्या नोटा, फॅन्सी नंबर्स नोटा, नोटांची बंडले, दुर्मिळ वस्तु अशा अनेक महत्त्वाच्या संग्रहीत दुर्मिळ वस्तू प्रदर्शनात पहायला मिळतील. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य आहेत. तरी या संधीचा सर्व नगरकरांनी व इतिहासप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास प्रेमी मंडळतर्फे आसिफ खान, अभिजित वाघ, युनूसभाई तांबटकर व भैरवनाथ वाकळे यांनी केले आहे.

# नगर येथील आनंदऋषीजी हॉस्पिटल डायलेसिस विभागाचे कार्य सर्वोत्तम

## राहुल भटेवडा यांचे प्रतिपादन, मोफत किडनीविकार तपासणी शिबिरास प्रतिसाद



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनीविकार तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

नगर – पूर्वी डायलेसिससाठी रुग्णांना मुंबई, पुणे येथे जावे लागत होते. जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक मशिनरी व उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून डायलेसिस विभाग नावारुपाला आलेला आहे. जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य, हॉस्पिटलचे सर्व स्टाफ अत्यंत सेवाभावी वृत्तीने रुग्णसेवेचे कार्य करीत आहे. यामुळेच हॉस्पिटलचे सेवाकार्य संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचले आहे. डायलेसिस विभागाच्या उत्कृष्ट कार्यामुळे हजारो रुग्णांना जीवदान मिळाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या डायलेसिस विभागाचे कार्य सर्वोत्तम आहे, असे प्रतिपादन उद्योजक राहुल भटेवडा यांनी केले आहे.


आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनीविकार तपासणी शिबिराचे आयोजन भटेवडा परिवाराचेवतीने करण्यात आले होते. याप्रसंगी मनोज भटेवडा, अक्षय भटेवडा, सौ.स्वातीताई भटेवडा, राहुल भटेवडा, संतोष भटेवडा, सौ.मीनाताई भटेवडा, किरण सुराणा, जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारिया, सतीश लोढा, प्रकाश छल्लाणी, वसंत चोपडा, अभय गुगळे, डॉ.आशिष भंडारी, डॉ.गोविंद कासट, डॉ.प्राजक्ता पारधे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रकाश छल्लाणी म्हणाले, भटेवडा परिवार हा धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. भटेवडा परिवार उत्तम व्यवसाय करीत असताना सामाजिक बांधिलकी म्हणून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्याशी जोडला गेलेला आहे. समाजातील गोरगरिब व गरजू रुग्णांची सेवा करण्यासाठी भटेवडा परिवार नेहमीच कार्यरत असतो. भटेवडा परिवारासारख्या समाजातील दानशूर व्यक्तींमुळेच मोठ्या प्रमाणात शिबिरे घेतली जात आहेत. शिबिराच्या माध्यमातून हॉस्पिटलचे कार्य सर्व दूर पसरले आहे.

डॉ.गोविंद कासट म्हणाले की, जिल्ह्यातील सर्वात मोठे व अद्यावत तंत्रज्ञानाने युक्त असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटलचा डायलेसिस विभाग आहे. डायलेसिससाठी वापरले जाणारे आरओ वॉटर, उच्च दर्जाचे मशीन व अद्यावत तंत्रज्ञान रुग्णांना जीवनदायी ठरत आहे. दर महिन्याला दोन हजार पेक्षा अधिक व वर्षाला २७ हजार डायलेसिस सुरु आहे. मागील ५ वर्षात सव्वा लाखाच्या पुढे रुग्णांचे आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत डायलेसिस करण्यात आले आहे. कावीळ झालेल्या रुग्णांच्या डायलेसिस साठी वेगळे मशीन उपलब्ध असून, तब्बल ३५ जर्मन कंपनीचे मशीन व अद्यावत फिल्टरींग युनिटच्या माध्यमातून सेवा दिली जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

या शिबिरात १५८ रुग्णांची मोफत किडनी विकार संबंधी विविध तपासण्या करण्यात आल्या. या शिबिरासाठी जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातून रुग्ण आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले व आभार मानले.

# नगरच्या रावसाहेब पटवर्धन सभागृहात २५ मे रोजी 'दुसरे बालपण कला - आनंद उत्सव २०२५' स्पर्धा




नगर – येथील मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित भारतातील पहिल्या 'दुसरे बालपण आनंद उत्सव २०२५' स्पर्धेची तयारी पुर्ण झाली असून त्यास उत्तम प्रतिसाद प्राप्त झाला आहे. खरं तर म्हातारपण म्हणजे दुसरे बालपणच असते. या वयातील सर्वांना दुसऱ्या बालपणातील आनंद लुटता यावा म्हणून सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यंदाचे वर्ष स्पर्धेचे दुसरे वर्ष असून सदर स्पर्धेमध्ये 'भारतीय सण आणि उत्सव' या विषया अंतर्गत नाटिका, नृत्यनाटिका, संगीत नाटिका सादर होणार आहेत. या बहारदार कलाआविष्काराचा आस्वाद नगरकरांना मोफत घेता येणार आहे. यासाठी कुठलेही शुल्क नाही अशी माहिती संयोजिका व मानकन्हैय्या ट्रस्टच्या कार्याध्यक्षा डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली.

त्यापुढे म्हणाल्या की सदर स्पर्धा २५ मे रोजी सकाळी ९ वाजता रावसाहेब पटवर्धन सभागृह, अहिल्यानगर येथे होत आहेत. यात वय वर्षे ५१ च्या पुढील स्त्री पुरूषांनी भाग घेतला आहे. विविध कलागुणांचे दर्शन येथे होणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ कविवर्य चंद्रकांत पालवे यांच्या हस्ते होणार असून सौ.सुरेखा डावरे, देवीप्रसाद सोहोनी, अभिजीत आपस्तंब परिक्षण करणार आहेत. दिवाळी, नवरात्र, संक्रांत, गणपती उत्सव वगैरे बहरदार सणाविषयीचे सादरीकरण येथे होणार आहे. रसिक प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक

या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी मानकन्हैय्या ट्रस्टचे संचालक डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया, ज्येष्ठ नाटयकर्मी पी डी कुलकर्णी, नंदकुमार देशपांडे, सदाशिव मोहिते, साहित्यिक चंद्रकांत पालवे, रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर, प्रसाद बेडेकर, गुरूमाऊलीचे चंद्रकांत पंडित, प्रशांत कटके आदी संयोजन समिती मार्गदर्शन करीत आहे.

पारितोषिके पुढील प्रमाणे सांघिक प्रथम रू. ५०००, करंडक व प्रमाणपत्र, सांघिक द्वितीय रू. ३०००, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, सांघिक तृतीय रू. २०००, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ (२) प्रत्येकी रू. १०००, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे.

# जागतिक स्किझोफ्रेनिया जागृती दिनी प्रत्येक रुग्णापर्यंत उपचारांसह पोहोचण्याचा संकल्प





इसळक (ता. जि. नगर) येथे मागील ५ वर्षांपासून मानसिक आरोग्यावरील बहुउद्देशीय स्वरूपाचा मानसग्राम प्रकल्प स्नेहालय संस्था साकारत आहे.

नगर – जागतिक स्किझोफ्रेनिया जागृती सप्ताहास २४ मे पासून आरंभ होत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णापर्यंत उपचारांसह पोहोचण्याचा संकल्प मानसग्राम प्रकल्पाने केल्याची माहिती प्रकल्पातर्फे देण्यात आली.

इसळक (ता. जि. नगर) येथे मागील ५ वर्षांपासून मानसिक आरोग्यावरील बहुउद्देशीय स्वरूपाचा मानसग्राम प्रकल्प स्नेहालय संस्था साकारत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, मालेगाव, बीड या जिल्ह्यात रस्त्यांवर बेवारस अवस्थेत फिरणाऱ्या स्किझोफ्रेनियाग्रस्त तुकड्यांना आधार आणि उपचार दिले जातात. अशा सुमारे ६०० स्त्री व पुरुष रुग्णांना निवासी उपचार देऊन त्यांच्याच कुटुंबात पुनर्वशीत करण्यात आले आहे. भारताच्या विविध राज्यांसह नेपाळ आणि बांगलादेश मध्येही रुग्णांचे परिवार त्यासाठी शोधण्यात आले.

यंदाच्या जागतिक स्किझोफ्रेनिया जागृती सप्ताहाच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात मानसिक आजारांपैकी स्किझोफ्रेनिया बद्दल विशेषत्वाने जागरूकता निर्माण केली जाणार आहे. सुमारे दहा लाख नागरिकांपर्यंत स्किझोफ्रेनिया बद्दलची माहिती पथनाट्य, प्रबोधन व्याख्याने, पत्रकांचे वाटप, समाज माध्यमे आणि अन्य माध्यमांचा उपयोग करून मानसग्राम पोहोचविणार आहे.

या निमित्ताने मानसिक उपचारांनी बऱ्या झालेल्या आणि सन्मानित जीवन जगणाऱ्या जुन्या रुग्णांचा मेळावा, रुग्णाच्या उपचारात कुटुंबाची भूमिका या विषयावरील चर्चासत्र, चित्र प्रदर्शनी त्यांचेही आयोजन करण्यात आले आहे.

### संकल्प ते सिद्धी

मानसग्राम प्रकल्पाची पायाभरणी २५ डिसेंबर २०२० रोजी रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित डॉ. भरत वटवाणी यांच्या प्रेरणेने झाली.

मानसोपचार तज्ञ डॉ. नीरज करंदीकर यांनी यातील वैद्यकीय उपचारांची धुरा सांभाळली.

क्लीनिकल सायकॉलॉजिस्ट सौ. दीप्ती करंदीकर, डॉ. मेघना मराठे, अॅक्युपंक्चर आणि अॅक्युप्रेशर थेरपीस्ट. डॉ. वृषाली सरोदे, पुणे येथील तज्ञ समुपदेशक दीपा राक्षे आणि माइंडफुलनेस थेरपिस्ट सौ. आसावरी गुपचूप यांचे या प्रकल्प विकासात योगदान लाभले.

### २ वर्षे मोफत उपचार

संपूर्ण बऱ्या झालेल्या रुग्णाला घरी पाठवल्यानंतर त्यातील गरीब आणि गरजू रुग्णांना पुढील २ वर्षांपर्यंत मोफत औषधे त्यांच्या घरी पाठवली जातात. आजपर्यंत १५५० रुग्णांना घरपोच औषध सेवा पुरविण्यात आली आहे. तसेच, महिन्यातून दोन वेळा रुग्णांच्या प्रकृतीची चौकशी केली जाते. मोबाईल द्वारे वेळोवेळी आणि तात्काळ समुपदेशन आणि मदत दिली जाते.

स्नेह मनोयात्री प्रकल्पाच्या उभारणीमधील पहिला टप्पा १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण होत आहे. त्यानंतर एकावेळी स्किझोफ्रेनिया ग्रस्त २०० मानसिक रुग्णांवर येथे निवासी उपचार केले जातील, अशी माहिती मानद संचालक डॉ. नीरज करंदीकर यांनी दिली.

मानसग्राम प्रकल्पातील रुग्ण भाजीचे उत्पादन, दुग्ध उत्पादन इत्यादी उत्पादक कामात सहभागी होतात. उपचारात घेऊन बरे झालेल्या, परंतु कुटुंबात स्वीकृती नसलेल्या रुग्णांसाठी एक समूह घर पुढील वर्षी साकारले जाणार आहे.

२४ मे रोजी सर्व नागरिकांना मानसग्राम पाहण्यासाठी खुले राहणार असल्याचे समन्वयक रमाकांत दोडी, प्रवीण मृत्याल यांनी कळवले आहे.

# राज्य शासनाच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दिव्यांग व्यक्तींचे प्रश्न मार्गी लावणार : नीताताई ढवण



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्र राज्य दिव्यांग आघाडी च्या वतीने दिव्यांग जोडो अभियानाचा शुभारंभाकरिता प्रदेशाध्यक्ष नीताताई ढवण अहिल्यानगर येथे आल्या असता त्यांचे स्वागत करताना शहर जिल्हाध्यक्ष संपतराव बारस्कर, संभाजी पवार, केतन क्षीरसागर, वैभव ढाकणे, राजेश भालेराव, नितीन घोडके, गणेश बारस्कर, लक्ष्मण पोकळे, जमीर पठाण, मच्छिंद्र खेडकर, बाळासाहेब गायकवाड आदी. (छाया– लहू दळवी)

## दिव्यांग जोडो अभियानाचा अहिल्यानगर शहरामध्ये शुभारंभ

नगर – दिव्यांग व्यक्तींचे विविध प्रश्न प्रलंबित असून ते सोडविण्याचे काम उपमुख्यमंत्री अजित पवार हेच करू शकतात. शासनाच्या विविध योजना दिव्यांग व्यक्तींसाठी असून त्या पोचविण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते करतील. यासाठी राज्यभर दिव्यांग जोडो मोहिमेचा शुभारंभ अहिल्यानगर शहरात झाला आहे. काही लोक दिव्यांग सर्टिफिकेट मिळवून शासकीय नोकरीत समाविष्ट होत आहेत. मात्र खरा दिव्यांग व्यक्ती या नोकरीपासून वंचित राहत आहे. यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून शासनाला गंभीर दखल घेण्यासाठी भाग पाडू. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अहिल्यानगर शहरातील दिव्यांग व्यक्तींचे प्रश्न मार्गी लागत आहे. दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या माध्यमातून मिळणारे मानधन वेळेत व वाढून मिळवण्यासाठी अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याचे प्रतिपादन दिव्यांग आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष नीताताई ढवन यांनी केले

अहिल्यानगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्र राज्य दिव्यांग आघाडी च्या वतीने दिव्यांग जोडो अभियानाचा शुभारंभ प्रदेशाध्यक्ष नीताताई ढवण यांच्या हस्ते झाले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, संभाजी पवार, युवक अध्यक्ष इंजि केतन क्षीरसागर, विद्यार्थी आघाडीचे अध्यक्ष वैभव ढाकणे, राजेश भालेराव, नितीन घोडके, गणेश बारस्कर, लक्ष्मण पोकळे, जमीर पठाण, मच्छिंद्र खेडकर, बाळासाहेब गायकवाड आदी उपस्थित होते

शहरातील सर्वच घटकातील नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ व्हावा यासाठी संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली आम्ही नागरिकांमध्ये योजनांची माहिती जनजागृती करीत आहोत. दिव्यांग व्यक्तींच्या व्यथा खूप गंभीर असून त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामाजिक बांधिलकी जोपासत नक्कीच मदतीचा हात देईल. नीताताई ढवण यांच्या माध्यमातून शहरातील दिव्यांग व्यक्तीचे प्रश्न सोडविण्याचे काम केले जाईल असे मत संपत बारस्कर यांनी व्यक्त केले.

# समर कॅम्प विद्यार्थी रंगले.. कथाकथनमध्ये



समर कॅम्प.. क्रिएटिव्ह टॅलेंटने आयोजित केलेल्या कार्यक्रमात कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचा कथाकथन कार्यक्रम झाला.

नगर – समर कॅम्प.. क्रिएटिव्ह टॅलेंट २०२५ ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचा कथाकथन कार्यक्रम झाला. नित्यसेवा सावेडी, अहिल्यानगर येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश पिंपळे होते. सरस्वती पूजन व औक्षण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

योगेश पिंपळे यांनी समर कॅम्पला मिळालेला प्रतिसाद, घेण्यात आलेले उपक्रम आणि प्रतिष्ठान तर्फे सादर होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

याप्रसंगी साहित्यिक बाळासाहेब देशमुख यांनी 'मानवतेचा धर्म' व 'चिमुरडी' या कथा सादर केल्या. छोट्या खेड्यात राहणारी डोळस, श्रध्दाळू सखुबाई, मूर्तीतला देव पाहण्यापेक्षा, मुलांना, सर्व जगताला घडविणाऱ्या, ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकाला ती मान देते. शिक्षकाला ती सरस्वती देवीचा पूजक मानते. कोणतेही भाडे, पैसे न घेता वर्षानुवर्ष आपल्या वाड्यातील खोली शिक्षकांना मोफत राहावयास देते. गोरगरिबां विषयी तिच्यात मानुसकीचा गहीवर दाटून येतो. तिच्या कार्यात आपल्याला बहिणाबाई चौधरी, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा वसा दिसून येतो.

'चिमुरडी' या कथेमधील चार वर्षाची छोटी बालिका, आजोबांना अनेक प्रश्न विचारत, कोडी घालते. त्यांची मुलाखत घेते. प्रश्नांचा भडीमार करत, आजोबांची भंबेरी उडवते. लहान मुलांची चिकित्सक वृत्ती आणि आजोबांची समर्पक उत्तरे, मुलांना वेगळीच 'शिकवण' देऊन जातात. या कथेतून देशमुखांनी लहान मुलांचे भावविश्व उलगडून दाखविले.. अभिनय, देहबोली सह सादर केलेल्या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षकवृंद, मंत्रमुग्ध होऊन गेले.. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेश्मा पवने, श्वेता जाधव, शिवम गायकवाड, प्रज्ञा अष्टेकर, साक्षी जाधव, सार्थक खोमणे यांनी सहकार्य केले.



डॉ. बस्वराज बकाली यांची एक्साइड बॅटरी या कंपनीच्या क्लस्टर हेड या पदावर नियुक्ती झाली त्याबद्दल आयएमएसच्यावतीने सत्कार करण्यात आला.

# 'मानव संसाधन'ला डॉ. बस्वराज बकाली यांनी एक उंची प्राप्त करून दिली : डॉ. एम. बी. मेहता

नगर – डॉ. बस्वराज बकाली यांनी मानव संसाधन विभागात एक प्रकारे आदर्श निर्माण केला असे प्रतिपादन आयएमएस संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी केले. डॉ बकाली यांची एक्साइड बॅटरी या कंपनीच्या क्लस्टर हेड या पदावर नियुक्ती झाली त्याबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे उपसंचालक डॉ विक्रम बार्नबस, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, ग्रंथालय प्रमुख डॉ. स्वाती बार्नबस आदी उपस्थित होते.

मेहता यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये बकाली यांनी दिलेल्या योगदानासाठी आभार व्यक्त केले व त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. बकाली यांनी सत्काराला उत्तर देताना त्यांना आपल्या कामाच्या ठिकाणी संस्थेची कशी मदत झाली त्याचप्रमाणे येथील विद्यार्थी यावर भाष्य केले. मानव संसाधन विभाग हा लोकांच्या आयुष्यात कशाप्रकारे बदल घडवून आणू शकतो याबद्दल त्यांनी आपले अनुभव कथन केले. कोणतेही काम माणुसकीच्या दृष्टिकोनातून केल्यास त्याचे चांगले परिणाम होतात हे देखील त्यांनी यावेळी नमूद केले. संस्थेच्या विकासात यापुढे देखील सहकार्य राहील असेही आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमाचे नियोजन प्रा. सय्यद मुद्दसर व प्रा. विजय शिंदे यांनी केले.

# पशुसंवर्धन दिनानिमित्त पाळीव जनावर व पशुंची निशुल्क तपासणी करुन लसीकरण व औषधोपचार



शुसंवर्धन दिनानिमित जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर आणि जिल्हा पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत पशू आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – पशुसंवर्धन दिनानिमित जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर आणि जिल्हा पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत पशू आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५५ जनावरांची तपासणी करून आवश्यक लसीकरण व औषधोपचार करण्यात आले.

जुने बस स्थानक, नगर–पुणे महामार्गावरील जवळील जिल्हा पशु सर्व चिकित्सालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक आयुक्त डॉ.मुकुंद राजळे पशुपक्षी आपल्या भावना त्यांच्या वेगळ्या भाषेतून व्यक्त करतात. त्यांचे दुःख वेदना समजून पशुचिकित्सक त्यांच्यावर सर्व प्रकारचे उपचार करतात. मुक्या प्राण्यांच्या वेदनांची जाणीव ठेवून संवेदनशीलतेने त्यांची काळजी घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

डॉ. भाऊसाहेब डौले यांनी जायंटस् ग्रुप जनावर व पशुंच्या आरोग्याच्या दृष्टीकोनाने सातत्याने घेत असलेले शिबिर दिशादर्शक आहे. जनावरांना बोलता येत नाही. त्यांच्या रोगाचे निदान करुन उपचार करणे अवघड बाब असल्याचे स्पष्ट करुन प्राण्यांच्या आरोग्य तपासणीचे महत्त्व सांगितले.

प्रास्ताविकात जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे म्हणाले की, या उपक्रमात गाय, बैल, घोडे, कुत्रे, शेळ्या आणि मांजरांसाठी अँटी–रेबीज व धनुर्वात लसीकरण तसेच जंतनाशक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. या शिबिरासाठी सातत्याने अजय मेडिकलतर्फे औषध पुरवठा करण्यात येत असल्याची त्यांनी माहिती दिली.

शिबिरात डॉ. मुकुंद राजळे, डॉ. ज्ञानेश्वर काळे, डॉ. वसंत गारुडकर, डॉ. तुषार घुले यांनी जनावरांची तपासणी करून औषधोपचार केले असे जायंटसचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया यांनी दिली.

शिबिरासाठी अलेंबिक फाम र्स्युटिकल, वीरबॅक निमल हेल्थ प्रायव्हेट लिमिटेड व इंटास कंपनीने मोफत औषधे पुरवली. कार्यक्रमाला जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अमित मुनोत, अजय मेडिकलचे संचालक दर्शन गुगळे, नूतन गुगळे, माजी अध्यक्ष अनिल गांधी, अमित धोका, महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गांधी यांनी केले. अमित मुनोत यांनी आभार मानले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## स्मार्टफोन वाढवतोय नैराश्य!



सध्याच्या धकाधकीच्या, असुरक्षिततेच्या जगात अनेक लोक नैराश्याच्या गर्तेत अडकत आहेत. नैराश्य आल्यानंतर अनेक जण स्मार्टफोनचा आणि समजमाध्यमांचा आधार घेतात. व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक यांच्या साहाय्याने मित्रांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतात, पण स्मार्टफोन तुमचे नैराश्य दूर करीत नाही, तर तो आणखी वाढवितो, असे एका संशोधनात दिसून आले आहे. विशेष म्हणजे भारतीय संशोधक व मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीच्या 'कॉलेज ऑफ कम्युनिकेशन आर्ट्स अ‍ॅंड सायन्सेस' या संस्थेचे अधिष्ठाता प्रभू डेव्हिड यांचाही या संशोधनात मोठा वाटा आहे.

लोक अलीकडे मानवी संवादाला इलेक्ट्रॉनिक यंत्रांच्या माध्यमातून संवाद साधून पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, असा सार्वत्रिक अनुभव आहे, पण ते विश्व आभासी असते त्यातून मानवी पातळीवरील संवादातून मिळणारे समाधान मिळत नाही, असे या वैज्ञानिकांचे मत आहे. नकारात्मक भावनांचा सामना करण्यासाठी अनेक जण तात्पुरत्या विरंगुळ्यासाठी मोबाईल फोनचा वापर करतात आणि कालांतराने ते त्यावर विसंबून राहतात. आपण तंत्रज्ञानात कितीही प्रगती केली असली, तरी मानवी पातळीवरील संवादाला खूप महत्त्व आहे. मोबाईल फोन मानवी संवादाची नक्कल करू शकतो, ते सगळे जग खरे आहे, असे वाटू लागते पण ते आभासी व कृत्रिम असते. सेऊल येथील सॉंगँग विद्यापीठाचे जुंग युन किम यांनी सांगितले, की दोन व्यक्तींमधील संवादामुळे नकारात्मक भावनांपासून खरोखर थोडे संरक्षण मिळते, त्यामुळे मोबाईल फोनमुळे नैराश्यात होणारी वाढही कमी करते. मोबाईलच्या अतिआहारी जाण्यापेक्षा समोरासमोर संभाषणाची सवय करण्याची वेळ आता आली आहे. स्मार्टफोनच्या वापरामुळे एक तर वेळ कसा काढायचा ही समस्या सुटते आणि दुसरे म्हणजे नकारात्मक भावना कमी होतात, असे वापरकर्त्यांना वाटते, पण ते खरे नाही.डेव्हिड यांच्या मते मोबाईल फोनमुळे मानसिक समस्या सुटत नाहीत उलट वाढतात. गंमत किंवा करमणुकीसाठी काही वेळा लोक मोबाईलचा वापर करतात त्याचा मात्र खूप दुष्परिणाम होत नाही. कुटुंबातील व्यक्तींनी एकमेकांना मोबाईलच्या माध्यमातून म्हणजे व्हॉटस्अ‍ॅप, फेसबुक या मार्गांनी भेटण्यापेक्षा प्रत्यक्ष संवाद साधला पाहिजे. मित्रांशी, कुटुंबीयांशी संपर्काचे ते साधन आहे पण भेटणे अगदीच शक्य नसते, तेव्हा ते वापरणे ठीक आहे. अन्यथा मानवी संवादाची जागा जेव्हा आभासी जग घेऊ लागते, तेव्हा मानसिक समस्या आणखी प्रबळ होतात. 'कॉम्प्युटर्स इन ह्यूमन बिहेवियर' या नियतकालिकात हा शोधनिबंध प्रसिद्ध झालेला आहे.

## पेट्रामध्ये शोध डझनभर सांगाड्यांचा



सध्या जगातील सात आश्चर्यांपैकी एक असणाऱ्या जॉर्डनमधील पेट्रा येथे पुरातत्त्व संशोधकांना उत्खननात एक कबर आढळून आली. ही कबर जागतिक वारसास्थळ असणाऱ्या ट्रेजरी इमारतीच्या अल खजनेह इथं सापडली. तिथे १२ सांगाडेही आढळले आहेत. तसेच काही प्राचीन भांड्यांचे अवशेषही इथे आढळले. याचठिकाणी 'इंडियाना जोन्स अ‍ॅंड द लास्ट क्रुसेड' यासारख्या चित्रपटांचे शूटिंगही झाले होते.

पेट्रा हे एक प्राचीन शहर असून, वाळवंटातील दऱ्या-खोऱ्यांमध्ये खडकांवर हातांनी कोरीवकाम करून शहर वसवण्यात आल्याचे संदर्भ आढळतात. 'राकेमे' अशी या शहराची स्थानिकांमध्ये असणारी ओळख. व्यापाराच्या निमित्ताने स्थलांतर करणाऱ्या आणि नाबातियन अरब समुदायानं साधारण इसवीसन पूर्व पाचव्या शतकात हे शहर वसवल्याचं सांगितलं जातं. पेट्राच्या नजीकच्या भागात ९००० वर्षांपासून मानवी वावर आढळतो. याच पेट्रा शहराच्या पोटात नेमकं दडलंय काय, याविषयी संशोधन सुरू असतानाच अतिशय गूढरित्या दडलेली ही कबर समोर आली. इलेक्ट्रोमॅग्नेटिक कंडक्टिविटी आणि रिमोट स्कॅनिंग, ग्राऊंड पेनेट्रेटिंग रडारच्या माध्यमातून या कबरीमध्ये नेमकं काय आहे याची माहिती मिळवण्यात आली. ज्यावेळी कबरीची एकंदर संरचना पाहिली गेली तेव्हा इथं तातडीनं उत्खनन सुरू करण्यात आलं. स्कॉटलंडमधील सेंट एंड्रयूज यूनिवर्सिटीतील जियोफिजिसिस्ट रिचर्ड बेट्स यांच्या मते, हे एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन असून, पेट्रा शहर कसं वसलं आणि नाबातियन कोण होते याची उकल होण्यास मदत होणार आहे. इथं एक सांगाडा मातीच्या भांड्याला पकडून असल्याचं दिसून आलं, तर कबरीच्या भिंती पहिल्या शतकाच्या मध्यापासून दुसऱ्या शतकादरम्यानच्या असल्याचं सांगितलं जात आहे.


## 'रामलीला'ची भारतबाह्य लोकप्रियता



प्राचीन काळातील बृहद्भारताच्या खुणा आजही आशियातील अनेक देशांमध्ये पाहायला मिळतात. त्यामध्ये आग्नेय आशियातील इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडियासारख्या अनेक देशांचाही समावेश आहे. इंडोनेशियात जगातील सर्वात जास्त मुस्लिम लोक राहतात; मात्र याठिकाणी आजही रामायण लोकप्रिय असून बाली बेटावर तर आजही मूळ इंडोनेशियन हिंदू बहुसंख्य आहेत. नवरात्रीच्या काळात आपल्याकडे, विशेषतः उत्तर भारतात ठिकठिकाणी 'रामलीला' आयोजित केली जाते. विजयादशमी म्हणजेच दसऱ्याला रावणवधाने या रामलीलेची सांगता होते; मात्र इंडोनेशियात वर्षातून अनेक वेळा असे रामायणावर आधारित प्रयोग होत असतात. हे प्रयोग बॅले किंवा नृत्यनाटिकेच्या रूपात असतात व ते स्थानिक जनतेत आणि परदेशी पर्यटकांमध्येही लोकप्रिय आहेत.

या देशातील जावा आणि बालीमध्ये रामायण बॅलेचा अद्भुत अनुभव इथले लोक वर्षानुवर्षे घेत आहे. हे नृत्यनाट्य रामायणावर कथांवर आधारित ते संगीत, नृत्य आणि अभिनयाच्या माध्यमातून संवादाशिवायच सादर करण्यात येते. इंडोनेशियातील बालीमध्ये १० व्या शतकात एक हिंदू मंदिर बांधण्यात आले. यावेळी इथे रामायणावर आधारित नृत्यनाट्य सादर करण्यात आले. या कलात्मक प्रेरणांचा स्रोत हे वाल्मिकींनी लिहिलेले रामायण होते. आजही रामायण नृत्यनाट्याची परंपरा आशिया खंडातील देशांमध्ये दिसून येते. इंडोनेशियातील जावा आणि बालीमध्ये या नृत्यनाट्याला 'केंद्रातरी' रामायण या नावाने ओखळले जाते, तर थायलंडमध्ये याला 'रामकीन' नृत्य आणि कंबोडियामध्ये त्याला 'रेमकर' नृत्य असे म्हटले जाते. विशेष म्हणजे इंडोनेशियामध्ये सादर केलेल्या या रामायण नृत्यनाट्याला २०१२ मध्ये गिनिज बुकने जगातील सर्वात रंगवलेले नृत्यनाट्य म्हणून नामांकन दिले आहे.

## मन जाणून घेणारी आज्ञावली



एखाद्याने आपल्या मनातली गोष्ट ओळखली तर आपण त्याला मनकवडा म्हणतो खरे, पण तो केवळ योगायोग असतो. एखाद्या व्यक्तीच्या मेंदूतून आलेले संदेश गोळा करून त्यांचे विश्लेषण करून लोकांचे विचार जाणून घेण्याचा प्रयोग वैज्ञानिकांनी यशस्वी केलेला असून, त्यात एका भारतीय वैज्ञानिकाचा समावेश आहे. या प्रयोगात माणसाच्या मनातील विचार ओळखण्यात ९६ टक्के यश आले आहे. माणसाचे मन म्हणजे त्याचे विचार सांगणारी आज्ञावली तयार करण्यात आली आहे. वॉशिंग्टन विद्यापीठातील मेंदूवैज्ञानिक राजेश राव यांनी सांगितले की, मानवी मेंदूला वस्तूंचे आकलन कसे होते व दुसरे म्हणजे एखादी व्यक्ती वास्तवात काय विचार करीत आहे हे संगणकाद्वारे कसे सांगता येईल हे आमचे दोन उद्देश होते. वैद्यकीयदृष्ट्या तुम्ही आमचे निष्कर्ष हे सकारात्मक कारणासाठी वापरू शकता. जे लोक विकलांग आहेत त्यांना मेंदूचे संदेश अवयवांपर्यंत न पोहोचल्याने हालचाली करता येत नाहीत. ही अडचण आमच्या संशोधनातून दूर होऊ शकते. फेफरे किंवा अपस्माराचा विकार असलेल्या सात रुग्णांवर अमेरिकेतील हाबरेव्ह्यू मेडिकल सेंटर येथे प्रयोग करण्यात आला. त्यात प्रत्येकाला अपस्माराचे झटके येत होते. यामुळे त्यांच्यावर शस्त्रक्रिया झालेल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या मेंदूतील कुंभखंड म्हणजे टेम्पोरल लोबमध्ये इलेक्ट्रोड बसवण्यात आले, असे विद्यापीठाचे मेंदू शल्यक्रियातज्ज्ञ जेफ ओजेमन यांनी सांगितले.

यात आज्ञावलीने मानवी मेंदूतील संदेशाचे दर सेकंदाला १००० वेळा विश्लेषण करण्यात आले. आता या आज्ञावलीने इलेक्ट्रोडचे ठिकाण व संदेश यांचीही सांगड घातली. त्या व्यक्तीने प्रत्यक्ष काय पाहिले हे सांगता आले. लोकांच्या प्रतिसादावर आधारित दोन तृतीयांश प्रतिमांवर त्यांना काय विचार आले असतील याचा शोध मेंदूतील संदेशातून घेण्यात आला. एक तृतीयांश प्रतिमा या लोकांना माहिती नसताना त्यांनी त्या वीस मिलिसेकंदात ९६ टक्के अचूकतेने ओळखल्या. हे तंत्र ब्रेन मॅपिंगसाठी वापरता येईल व कुठल्या माहितीवर मेंदूतून काय प्रतिसाद येतो हे कळू शकेल, असे राव यांचे म्हणणे आहे. 'प्लॉस काम्प्युटेशनल बायॉलॉजी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

## सर्वात छोटा साप



जगात विषारी आणि बिनविषारी प्रजातीचे अनेक साप पाहायला मिळत असतात. किंग कोब्रा हा जगातील सर्वाधिक लांबीचा विषारी सर्प आहे. ॲनाकोंडा, अजगरासारखे साप बिनविषारी असतात, पण अतिशय मोठ्या आकाराचे असतात. जगाच्या पाठीवर एक अतिशय चिमुकला सापही पाहायला मिळतो. त्याला पाहिले की आपण एखाद्या गांडुळाला पाहतो आहे की काय असे कुणालाही वाटावे, इतका त्याचा लहान आकार असतो. या सापाला बार्बाडोस थ्रेड असे नाव आहे. एखाद्या थ्रेड म्हणजेच धाग्यासारखाच त्याचा देह असतो !

हा साप इतका लहान असतो की आपल्या तळहातावरही तो सहज सामावू शकतो. त्याची लांबी ३.९४ सेंटीमीटर ते ४.०९ सेंटीमीटर इतकी असते. हा साप बहुतांशी मुंग्या व वाळवी खाऊन उदरभरण करतो. पूर्व कॅरेबियन बेट बार्बाडोसमध्ये हा साप आढळतो. त्यामुळे त्याचे नाव या बेटावरूनच ठेवण्यात आले आहे. हा साप बिनविषारी आहे. त्याने दंश केला तर किरकोळ वेदना किंवा हलकी जखम होऊ शकते. त्याच्यापासून माणसाला कोणताही धोका संभवत नाही. इतका चिमुकल्या आकाराचा साप अर्थातच लोकांच्या कुतुहलाचा विषय बनतो. त्याच्या लहान आकारामुळे त्याच्या जीवाला धोकेही बरेच असतात. निसर्गाची अनोखी करामत म्हणून या सापाकडे पाहिले जात असते.

## 'लाल ठिपक्याला' झालय काय?



आपल्या ग्रहमालिकेतील सर्वात मोठा ग्रह म्हणजे गुरु. या ग्रहाच्या पृष्ठभागावरील लालसर ठिपका सर्वांचे लक्ष वेधून घेत असतो. हा ठिपका म्हणजे निव्वळ वायूचा गोळा असलेल्या या ग्रहावरील अनेक वर्षांपासून सुरू असलेले अतिशय मोठे वादळ आहे. त्याचा आकारही खगोलशास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेत असतो. आता हा ठिपका वेळोवेळी दबला जात असल्याचे आढळून आले आहे. त्याची रुंदी दबली जात आहे किंवा तो आक्सत असल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे. त्याचे कारण मात्र संशोधकांना समजू शकलेले नाही. या ठिपक्याला ग्रेट रेड स्पॉट (जीआरएस) म्हणून ओळखले जाते. हबल अंतराळ दुर्बिणीने याबाबतचे नवे निरीक्षण नोंदवले आहे. दर ९० दिवसांनी हा ठिपका आतील बाजूस दबला जाऊन पुन्हा बाहेर येत असल्याचे दिसून आले आहे. जणु काही या ठिपक्याला पिळा पडून तो सैल होत असल्यासारखे चित्र दिसते. गेल्या अनेक दशकांपासून हा ठिपका आकसत चालला आहे. सध्या त्याचा आकार १४,७५० किलोमीटरचा असल्याचे सांगितले जाते. मात्र ॲस्ट्रोफोटोग्राफर डॅमियन पीच यांनी तो सध्या १२,५०० किलोमीटर आकाराचा असल्याचे म्हटले आहे. या ठिपक्याचे गूढ नेहमीच संशोधकांना बुचकळ्यात टाकत असते. नासाच्या गोडार्ड स्पेस फ्लाईट सेंटरमधील ॲमी सायमन यांनी सांगितले की हबलने या ठिपक्याची हाय रिझोल्युशन प्रतिमा टिपल्या आहेत. त्यावरून विशिष्ट कालावधीत तो दबला जातो व पूर्ववत होतो असे दिसून आले. हे अतिशय अनपेक्षित असून त्याचे सध्याच्या घडीला कोणतेही हायड्रोडायनॅमिक स्पष्टीकरण नाही. खगोलशास्त्रज्ञ सायमन यांनी हबल दुर्बिणीच्या सहाय्याने या ठिपक्याचे डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत दर ८८.५ दिवसांनी निरीक्षण केले. या काळातील प्रतिमांचा टाईमलॅप्सही बनवण्यात आला. त्यामधून असे आढळले की विशिष्ट कालावधीत हा ठिपका आकसतो आणि पसरतो. हे नेमके कशामुळे घडत आहे हे अद्याप समजू शकलेले नाही.

## चवीला कडू, आरोग्यासाठी गोड

बहुतांश लोक आरोग्याच्या विचार न करता बहुतांशी चवीसाठीच खात-पित असतात; मात्र शरीराचे आरोग्य चांगले राहिले तरच आपल्याला सुखोपभोग घेता येतील किंवा वेगवेगळ्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवता येईल, हे विसरले जाते. काही पदार्थांची चव आपल्याला तितकीशी आवडत नाही; मात्र हे पदार्थ आरोग्यासाठी गुणकारी असल्याने त्यांचे सेवन करणे गरजेचे ठरते, असे आहारतज्ज्ञ सांगतात. अशाच काही पदार्थांची ही माहिती....



**कडुलिंब :** कडुलिंब एक असे झाड आहे ज्याचा प्रत्येक भाग औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. कडुलिंबाची पाने, साल, बिया आणि फळे हे सर्व आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. कडुलिंबाचा उपयोग त्वचा रोग, दंत समस्या, मधुमेह आणि इतर अनेक आजारांवर केला जातो. कडुलिंबामध्ये ॲंटिबॅक्टेरियल, ॲंटिफंगल आणि ॲंटि-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुम्ही कडुलिंबाच्या पानांचा उष्टा पिऊ शकता किंवा कडुलिंबाचे तेल वापरू शकता. कडुलिंबाची पाने गुढीपाडव्याला गुळ वगैरे घालूनही खाल्ली वातात.

**मेथी दाणे :** मेथीचे दाणे हे एक लहान बियाणे आहे जे अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेले आहे. मेथीचे दाणे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास, कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतात. मेथीचे दाणे भाज्या मसूर किंवा सूपमध्ये वापरता येतात. तुम्ही मेथीच्या दाण्यांची पावडरही बनवून पाण्यात मिसळून पिऊ शकता.





**तुळस :** तुळशी ही एक पवित्र वनस्पती आहे जी अनेक आरोग्य लाभांनी भरलेली आहे. तुळशीचा उपयोग सर्दी, खोकला, ताप आणि इतर अनेक आजारांवर केला जातो. तुळशीमध्ये ॲंटिऑक्सिडेंट, ॲंटिबॅक्टेरियल आणि ॲंटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुम्ही तुळशीच्या पानांचा डेकोक्शन पिऊ शकता किंवा तुळशीची पाने चघळू शकता.

**कारले :** कारले ही एक कडू भाजी आहे जी अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेली आहे. कारले रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास, वजन कमी करण्यास आगि दुष्टी सुधारण्यास मदत करते. कारल्याचा वापर भाज्या, सुप किंवा ज्यूसमध्ये करता येतो. तुम्ही कारल्याचे लोणचेही बनवू शकता.





**काळी मिरी :** काळी मिरी हा एक असा मसाला आहे जो अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेला आहे. काळी मिरी पचन सुधारण्यास, वजन कमी करण्यास आणि सर्दी-खोकल्यापासून आराम देण्यास मदत करते. काळी मिरी स्वयंपाकात वापरली जाऊ शकते. काळी मिरी पावडर बनवून त्यात पाण्यात मिसळून प्या.

## चमत्कारीक मूर्ती



आपल्या देशात अनेक अनोखी मंदिरे आहेत. प्रत्येक मंदिराचे एक वेगळे वैशिष्ट्यही असते जे सध्याच्या २१ व्या शतकातही कायम आहे. कर्नाटकातही अशी अनेक मंदिरे आहेत. रायचूर जिल्ह्यामध्ये ९०० वर्षांपूर्वीचे श्री लक्ष्मी-व्यंकटेश मंदिरही असेच वेगळे वैशिष्ट्य असलेले आहे. या मंदिरातील श्री व्यंकटेशाच्या पाषाण मूर्तीवर रोज सकाळी गरम पाण्याने अभिषेक घातला जातो. असे म्हटले जाते की, हे उकळलेले पाणी ज्यावेळी मूर्तीच्या डोक्यावरील मुकुटावर ओतले जाते त्यावेळी ते पायापर्यंत येता येताच थंड होते.

सर्वसाधारणपणे एक लिटर पाणी १०० अंश सेल्सिअस तापमानापर्यंत गरम केले तर ते थंड होण्यासाठी दोन तासांचा कालावधी लागत असतो. मात्र, या मूर्तीच्या डोक्यावर ओतलेले असे उष्ण पाणी पायापर्यंत येता-येताच थंड होते. याउलट जर डोक्यावर थंड पाणी ओतले तर ते पायापर्यंत येत असताना उष्ण होते, असे सांगितले जाते. मात्र, जर मूर्तीच्या बेंबी किंवा पायावर उष्ण किंवा थंड पाणी ओतले तर ते आहे त्याच स्वरूपात वाहून जाते. या मूर्तीच्या काळ्या पाषाणात किंवा मूर्तीमध्ये असे कोणते वैशिष्ट्य आहे, ज्यामुळे डोक्यावर ओतलेले उष्ण पाणी तत्काळ थंड होते, याबाबत भाविकांना नेहमीच कुतुहल वाटत असते. कर्नाटकातच गदगमध्ये व्यंकटपुरा नावाचे गाव आहे. याठिकाणीही श्री लक्ष्मी-व्यंकटेश मंदिर आहे. या मंदिरातील मूर्तीचेही एक वेगळे वैशिष्ट्य आहे. याठिकाणी केवळ एक पाषाणच होता. त्यावर व्यंकटेशाची आकृती असलेल्या पुसटशा रेषा कोरलेल्या होत्या. शंभर वर्षांपूर्वीपासून हळूहळू या आकृतीमधून आपोआपच व्यंकटेशाची आकृती उत्थान पावत आकार घेऊ लागली. सध्या तिथे या पाषाणातून निर्माण झालेली सुंदर मूर्ती पाहायला मिळते, असे सांगितले जाते.

# शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यासाठी अधिकारी व बँकांनी समन्वयाने काम करावे

## जिल्हाधिकारी डॉक्टर पंकज आशिया यांचे निर्देश

नगर – शेतकऱ्यांना पिकांच्या मशागतीसाठी पीककर्जाची निकड भासते. चालू हंगामामध्ये जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याला पीककर्ज मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनातील अधिकारी व बँकांनी समन्वयाने काम करावे. बँकांना पीककर्ज वाटपाचे देण्यात आलेले उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण होईल, यादृष्टीने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आरबीआयचे प्रतिनिधी राजेंद्र कनिशेट्टी, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, नाबार्डचे विक्रम पठारे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक बालाजी बिराजदार, ग्रामोद्योग अधिकारी बालाजी मुंडे, जिल्हा अभियान व्यवस्थापक सोमनाथ जगताप, पर्यटन संचालनालयाच्या प्रकल्प अधिकारी गायत्री साळुंके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी बँकांना उद्दिष्ट ठरवून देण्यात येते. दिलेले उद्दिष्ट विहित वेळेत पूर्ण करुन प्रत्येक गरजू व पात्र शेतकऱ्याला पीककर्ज मिळावे यासाठी कृषी विभाग, ग्रामसेवक तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या सहकार्यातून बँकांनी ग्रामीण पातळीवर कॅम्पचे आयोजन करावे. पीककर्जासाठी आवश्यक असणारी कागदपत्रांची पूर्तता या कॅम्पच्या माध्यमातून करुन घेण्यात यावी. क्षुल्लक कारणांवरून कर्जाचे प्रस्ताव नाकारण्यात येऊ नयेत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांशी चर्चा करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

शासकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या कर्जांची प्रकरणे बँकांकडे संबंधित विभागामार्फत पाठविण्यात येतात. अशी कर्ज प्रकरणे मंजूर करण्याच्या प्रक्रियेमध्ये विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. बँकांमध्ये प्रलंबित असलेले अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावेत. ग्राहकांनी बँकांकडे केलेल्या तक्रारींचा निपटारा वेळेत करुन त्याची माहिती सादर करण्यात यावी. ई– पीक रिक्षासाठी मंजूर लाभार्थ्यांना तातडीने निधीचे वितरण करावे. जिल्ह्यातील उद्योजकांना आवश्यक असणाऱ्या तांत्रिक मनुष्यबळाच्या मागणीनुसार आरसेटीमार्फत प्रशिक्षण घेण्याच्या सूचनाही डॉ. आशिया यांनी दिल्या.

## ‘आई’ महिला केंद्रित पर्यटन धोरणाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करा

पर्यटन क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी व महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने जाहीर केलेल्या ‘आई’ महिला केंद्रीत पर्यटन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. महिला उद्योजकता विकास, महिलांकरिता पायाभूत सुविधा, महिला पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य, महिला पर्यटकांसाठी कस्टमाईज्ड उत्पादने–सवलती व प्रवास आणि पर्यटन विकास ही महिलांसाठीच्या पर्यटन धोरणाची पंचसुत्री आहे. या पंचसुत्रीवर अधिक लक्ष केंद्रीत करत जिल्ह्यातील पर्यटनक्षेत्र असलेल्या ठिकाणी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात येऊन महिलांना योजनेची माहिती द्यावी. योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तताही या ठिकाणी करण्यात येऊन ही योजना जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

यावेळी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, प्रधानमंत्री मुद्रा योजना, सीएमईजीपी, पीएमईजीपी, एमएसआरएलएम, पी. एम विश्वकर्मा यासह ईतर विभागामार्फत कर्ज पुरवठ्यासाठी दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. तसेच यावेळी जिल्हा पत आराखडा २०२५ चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

बैठकीस जिल्ह्यातील विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या काही भागात २५ मे पर्यंत पाऊस

नगर – जिल्ह्याच्या काही भागात २२ मे रोजी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस गडागडाटासह वादळी वारा, वीज पडण्याची शक्यता तसेच २३ मे रोजी गडगडाटासह वादळी वारा, वीज पडणे तसेच मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असुन जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच २४ व २५ मे रोजी वीजांच्या कडकडाटांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज्) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी (Selfie) काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे.

शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यांपासून स्वत:सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१– २३२३८४४ अथवा २३५६९४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# गाडगीळ पटांगणमध्ये संपूर्ण कॉंक्रिटीकरण करण्यात यावे

## आमदार संग्राम जगताप यांच्याकडे माजी नगरसेविका सोनाली चितळे यांची मागणी





नगर – अहिल्यानगर वाचनालय ते लक्ष्मी कारंजा, पटवर्धन चौक, आनंदी बाजार ते सीना नदीपर्यंत अंडरग्राऊंड गटार व संपूर्ण रस्ता कॉंक्रिटीकरण करण्याचे काम सध्या सुरू आहे. सदर रस्त्याचे कॉंक्रिटीकरण नऊ मीटर धरलेले आहे. परंतु गाडगीळ पटांगणमध्ये पटांगण एरिया मोठा असल्याने रस्ता झाल्यानंतर अर्धवट राहिलेल्या ग्राऊंडमध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणावर साठा साचणार आहे. सदर पटांगणामधून पाच ते सहा शाळांना जाण्यासाठी विद्यार्थी ये–जा करीत असतात. तसेच सदर ठिकाणावर मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असल्याने पाणी साठल्यामुळे त्या ठिकाणी डासांचे प्रमाण वाढून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे गाडगीळ पटांगणमध्ये रस्ता करताना संपूर्ण गाडगीळ पटांगणमध्ये कॉंक्रिटीकरण करण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेविका सोनाली अजय चितळे यांनी केली आहे.

# कॅफेमध्ये अश्लील चाळे करताना तरुण – तरुणी आढळले, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – कॉफी शॉपच्या नावाखाली कॉलेजमधील मुलामुलींना अश्लील चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणाऱ्या कॅफेवर कोतवाली पोलिसांनी छापा टाकला असता तेथे अश्लील चाळे करताना तरुण–तरुणी आढळून आले आहेत. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बुरुडगाव रोडवरील डॉक्टर कॉलनी येथील कॅफे बेला चाय येथे २२ मे रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की, बुरुडगाव रोड येथील डॉक्टर कॉलनीतील कॅफ बेला चाय येथे कॉलेजमधील मुलामुलींना अश्लील चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देत आहे. त्यांच्यावर कारवाई करा असा आदेश पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी कोतवालीच्या पोलिस पथकास दिले होते. त्यानुसार पथकाने बुरुडगाव रोडवरील डॉक्टर कॉलनी येथील बेला चाय कॅफेवर अचानक छापा टाकला असता कॅफेच्या काउंटरवर एक जण बसलेला होता. पोलिसांनी त्यास नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव मंगेश भरत आजबे (रा.लांभारवाडी, ता. जामखेड हल्ली रा. डॉक्टर कॉलनी बुरूडगाव रोड) असे असल्याचे सांगितले.

तसेच कॅफेच्या मालकाचे नाव विचारले असता त्याने त्याचे मालकाचे नाव महेश शंकर दरंदले (रा. चिपाडे मळा अ.नगर) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी कॅफेची पाहणी केली असता कॅफेत चार बाय सहा लांबी रुंदीचे प्लायवूडचे बंदिस्त कंपार्टमेंट करून पडदे लावून अंधार करुन शाळा व कॉलेजमधील मुला मुलींना अश्लील चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिलेली दिसून आली. त्यात काही मुले मुली अश्लील चाळे करताना दिसल्याने पोलिसांनी त्यांना पकडून त्यांची नाव व विचारुन खात्री करून त्यांना समज देऊन सोडून दिले.

कॉफी शॉपचे दर्शनी भागात कॉफी शॉपचा कुठलाही परवाना दिसून आला नाही. किंवा कॉफी बनवण्यासाठी लागणारे साहित्य दिसून आले नाही. त्यामुळे पो.कॉ. सचिन लोळगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मंगेश आजबे व महेश दरंदले यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम १२९,१३१ (क) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक – २३/०५/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, **जिल्हापरिषद** हद्दीतील **मौजे वडगांव गुप्ता** येथील **सर्व्हे नंबर १०२/१/२ मधील** खालील वर्णनाची मिळकत

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५५.३६ | ३५. | ९२.८० | ६९. | १०१.१२ |
| २. | १४५.०० | ३६. | ९२.८० | ७०. | ८१.९२ |
| ३. | १४५.०० | ३७. | ९२.८० | ७१. | ८१.९२ |
| ४. | १४५.०० | ३८. | ९२.८० | ७२. | ८१.९२ |
| ५. | १०८.७२ | ३९. | ९२.८० | ७३. | ८१.९२ |
| ६. | ८७.०० | ४०. | ९२.८० | ७४. | ८१.९२ |
| ७. | ८७.०० | ४१. | १३१.२४ | ७५. | ८१.९२ |
| ८. | ८७.०० | ४२. | १३१.२४ | ७६. | ८१.९२ |
| ९. | १२३.७५ | ४३. | ९२.८० | ७७. | ११३.५७ |
| १०. | १२५.४४ | ४४. | ९२.८० | ७८. | १८९.३३ |
| ११. | ८७.०० | ४५. | ९२.८० | ७९. | २०१.२८ |
| १२. | ८७.०० | ४६. | ९२.८० | ८०. | २००.०० |
| १३. | ८७.०० | ४७. | ९२.८० | ८१. | २००.०० |
| १४. | १०८.७८ | ४८. | ९२.८० | ८२. | २००.०० |
| १५. | ११४.५७ | ४९. | ९२.८० | ८३. | १९३.२५ |
| १६. | ९२.८० | ५०. | ११४.५७ | ८४. | १७९.२५ |
| १७. | ९२.८० | ५१. | ११४.५७ | ८५. | १६८.१८ |
| १८. | ९२.८० | ५२. | ९२.८० | ८६. | १७७.०९ |
| १९. | ९२.८० | ५३. | ९२.८० | ८७. | १७७.०९ |
| २०. | ९२.८० | ५४. | ९२.८० | ८८. | १७७.०९ |
| २१. | ९२.८० | ५५. | ९२.८० | ८९. | १७७.०९ |
| २२. | ९२.८० | ५६. | ९२.८० | ९०. | १३७.१० |
| २३. | १३१.२४ | ५७. | ९२.८० | ९१. | १३७.१० |
| २४. | १३१.२४ | ५८. | ९२.८० | ९२. | १७५८.०६ |
| २५. | ९२.८० | ५९. | १३१.२४ | ९३. | १२००.३० |
| २६. | ९२.८० | ६०. | १३२.५६ | ९४. | ११२६.६९ |
| २७. | ९२.८० | ६१. | ९४.८४ | ९५. | ११७५.२१ |
| २८. | ९२.८० | ६२. | ९४.८४ | ९६. | १२५४.५१ |
| २९. | ९२.८० | ६३. | ९४.८४ | ९७. | १२४६.०० |
| ३०. | ९२.८० | ६४. | ९४.८४ | ९८. | १३०८.३९ |
| ३१. | ९२.८० | ६५. | ९४.८४ | ९९. | १३०६.१२ |
| ३२. | ११४.५७ | ६६. | ९४.८४ | १००. | १३४६.९३ |
| ३३. | ११४.५७ | ६७. | ९४.८४ | | |
| ३४. | ९२.८० | ६८. | ११७.०८ | | |

**यांसी चतु:सिमा : मंजुर रेखांकनाप्रमाणे.**
**सदर मिळकतीचे विद्यमान मालक -**
**श्री. सचिन विजय बारस्कर**
रा. सावेडी, अहिल्यानगर (अहमदनगर).

**ॲड. प्रणव सुधीर धर्माधिकारी**
**ॲड. सौ. नुतन प्रणव धर्माधिकारी**
मो.नं.९०२८००८२००
पत्ता – भंडारी सावज अपार्टमेंट, कोठीरोड, अहिल्यानगर (अहमदनगर)


# कारवाईला स्थगिती न दिल्यास व पर्यायी जागा उपलब्ध करून दिली नाही, तर २७ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुटुंबीयांसह बेमुदत उपोषण

नगर – श्रीगोंदा तालुक्यातील पिंपळगाव पिसा (शेंडगे वस्ती) येथे शासकीय गायरान जमिनीवर मागील तीन पिढ्यांपासून राहत असलेल्या भूमिहीन आदिवासी पारधी समाजाच्या कुटुंबीयांना ग्रामपंचायतीकडून घरे पाडण्याच्या नोटीसा देण्यात आल्याने परिसरात संतापाचे वातावरण आहे. भर पावसाळ्यात अशा प्रकारे घरांवर कारवाई करण्यासंदर्भात पीडित कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त करुन, प्रशासनाकडे तात्काळ कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली आहे.



पीडित कुटुंबीयांच्या वतीने प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

याबाबत पीडित कुटुंबीयांच्या वतीने प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. आदिवासी पारधी कुटुंबीयांच्या मागणीला बहुजन समाज पार्टीच्या वतीने पाठिंबा देण्यात आला आहे. यावेळी यावेळी सुमन भोसले, सुवर्णा भोसले, रवी पवार, गोपीनाथ भोसले, कार्तिक भोसले, बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी सुनील ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, माजी जिल्हाध्यक्ष उमाशंकर यादव, विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब काते, जिल्हा महासचिव राजू शिंदे, योगेश खेंडके आदी उपस्थित होते.

या निवेदनाद्वारे त्यांनी पर्यायी जागा उपलब्ध करून त्या ठिकाणी घरे बांधून द्यावीत, अशी मागणी केली आहे. अन्यथा आम्हाला राहण्यासाठी दुसरे ठिकाण नसल्याने आणि सध्याच्या पावसाळी परिस्थितीत लेकराबाळांना घेऊन घर सोडणे अशक्य असल्याने जबरदस्तीने कारवाई झाली तर आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नसल्याचे भावनिक आवाहन केले आहे.

ग्रामपंचायतीने केवळ आदिवासी पारधी समाजाच्या कुटुंबांना जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्याच गटांमध्ये इतर समाजाची घरे असताना केवळ पारधी समाजावरच ही कारवाई होणे अन्यायकारक असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. त्यामुळे ही कारवाई पक्षपाती असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शासनाने या कारवाईला स्थगिती न दिल्यास व पर्यायी जागा उपलब्ध करून दिली नाही, तर २७ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुटुंबीयांसह बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा पीडित कुटुंबीयांसह बसपाच्या वतीने देण्यात आला आहे.

## जिल्हा पोलिस अधीक्षकपदी सोमनाथ घार्गे यांची नियुक्ती



नगर – जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची बदली बृहन्मुंबईचे पोलीस उपायुक्त म्हणून झाली असून त्यांच्या जागी रायगडचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना जानेवारी मध्येच पदोन्नती देण्यात आलेली होती, त्यांना निवडश्रेणी मिळाली होती मात्र त्यावेळी त्यांना आहे त्याच ठिकाणी नियुक्ती देण्यात आली होती. आता ते बृहन्मुंबईचे पोलीस उपायुक्त झाले आहेत. तर रायगड येथून बदलून आलेले सोमनाथ घार्गे यांनी यापूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यात पोलीस उपअधीक्षक म्हणून काम पाहिले असून श्रीरामपूर पोलीस उपअधीक्षक म्हणून ते नियुक्त होते. त्यामुळे त्यांना जिल्ह्याची बऱ्यापैकी माहिती असणार आहे.

बहुचर्चित देवळाली प्रवरा येथील बबलू पंडित हत्याकांडाचा तपास सुद्धा त्यांच्याकडे होता. आता त्यांच्यासमोर आगामी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपंचायत निवडणुका शांततेत पार पाडण्याची जबाबदारी असेल.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्र.अपर जिल्हादंडाधिकारी अरुण उंडे यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २६ मे रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या अध्यक्षपदी जालिंदर बोरुडे यांची निवड



नगर – राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपदी अहिल्यानगर येथील नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीची घोषणा समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत रानडे यांनी केली.

जालिंदर बोरुडे हे गेल्या ३२ वर्षापासून अहिल्यानगरसह महाराष्ट्रात नेत्रदान चळवळ प्रभावीपणे राबवित आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपदी निवड केली असल्याची माहिती संस्थेचे सचिव यशवंत भोसले यांनी दिली. लवकरच संपूर्ण महाराष्ट्रभर या संघटनेची कार्यकारणी जाहीर करण्यात येणार असून, महाराष्ट्रात प्रभावीपणे नेत्रदान चळवळ राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी दिली.

## नगरमध्ये तोतया तृतीयपंथी व्यक्तीला पकडले

नगर – तृतीयपंथी असल्याची बतावणी करत तशी वेशभूषा करून शहरात पैसे गोळा करणाऱ्या एका तोतया तृतीयपंथी व्यक्तीला तृतीयपंथी संघटनेचे प्रमुख काजलगुरु यांनी पकडले. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रवीण उत्तम जाधव (रा. गांधीनगर) असे त्याचे नाव आहे. एक व्यक्ती तृतीयपंथी असल्याचा वेश परिधान करून पैसे मागत असल्याची माहिती काजलगुरु यांना मिळताच त्यांनी सहकाऱ्यांसह जाऊन एका सराफ दुकानाजवळ त्याला अडवले. त्याचा राग आल्याने या तोतयाने त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली. मला अडवले तर मी गांधीनगर येथून मुले आणून तुम्हाला मारेल, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. अधिक तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल शिरसाठ करत आहेत.

